दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१२४ गुरूवार दि.०८ जानेवारी २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-124 Thursday, Dt.08 January 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# रस्ते भटक्या कुत्र्यापासून मुक्त करा

## सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण टिप्पणी कुत्र्यांचे समादेशन करण्याचा सल्ला

नवी दिल्ली : भटकी कुत्री केवळ चावतात असे नाही, तर ते गंभीर अपघातांनाही कारणीभूत ठरतात. रस्ते भटक्या कुत्र्यापासून मुक्त आणि मोकळे ठेवावे लागतील अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी आज (दि. ७ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयाने केली. यावेळी न्यायालयाने पीडित, प्राणीप्रेमी आणि विरोधक अशा सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेणार असल्याचे स्पष्ट केले. आज याचिकाकर्ते, प्राणी कल्याण संस्था, आणि हस्तक्षेपकर्त्यांच्या युक्तिवादानंतर सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्याच्या प्रकरणाची पुढील सुनावणी गुरुवार दि. ८ जानेवारीपर्यंत तहकूब केली आहे.



८ जुलै २०२५ रोजी दिल्लीतील एका माध्यमातील रिपोर्टची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेतली होती. तेव्हापासून आतापर्यंत या प्रकरणी ५ वेळा सुनावणी झाली आहे. आज अनेक याचिकांवर एकत्रित सुनावणी झाली असून न्यायालय यावर कोणता ठोस आदेश देत, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. देशातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या सुळसुळाटावर आणि त्यांच्यामुळे होणा-या त्रासावर न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संजय मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रश्न केवळ कुत्रे चावण्याचा नाही, तर सुरक्षिततेचाही आहे. मोकाट कुत्रे अचानक रस्त्यावर धावल्यामुळे वाहनांचे अपघात होतात. सकाळी कोणता कुत्रा कोणत्या मूडमध्ये आहे, हे सांगता येत नाही असे निरीक्षण न्यायमूर्तींनी नोंदवले. यावेळी न्यायमूर्ती संजय मेहता यांनी शाळा आणि न्यायालय परिसरात कुत्र्यांची काय गरज?, असा सवाल केला. अशा जागा कुत्र्यापासून मुक्त असायला हव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कपिल सिब्बल यांनी कुत्र्यांना पकडून, नसबंदी करून पुन्हा त्याच भागात सोडण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख केला, तेव्हा न्यायालयाने मिश्किल टिप्पणी केली. न्यायालय म्हणाले आता फक्त एकच गोष्ट बाकी आहे, ती म्हणजे कुत्र्यांचे समुपदेशन करणे; जेणेकरून पुन्हा सोडल्यानंतर ते कोणाला चावणार नाहीत.

कपिल सिब्बलांना न्यायालयाचा सल्ला

भटक्या कुत्र्यांसाठी कार्यरत असणा-या संस्थांच्या वतीने युक्तीवाद करताना कपिल सिब्बल म्हणाले, मी जेव्हा जेव्हा मंदिरात गेलो आहे, तेव्हा मला कधीही काहीही चावलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले, तुम्ही भाग्यवान आहात. लोकांना चावले जात आहे, मुलांना चावले जात आहे. लोक मरत आहेत. कपिल सिब्बल म्हणाले, जर कुत्रा एखाद्याला चावला तर तुम्ही केंद्राला फोन करा, ते त्याला घेऊन जातील, निर्जंतुकीकरण करतील आणि त्याच भागात परत सोडतील.

सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले, कुत्र्यांना सोडल्यावर ते चावू नयेत म्हणून त्यांचे समुपदेशन करणे बाकी आहे. कुत्र्यांना हटवणे किंवा मारणे हा उपाय नाही. वैज्ञानिक पद्धतीने (नसबंदी करून) त्यांची संख्या कमी करता येईल. कुत्र्यांचे सरासरी वय १० वर्षे असते, त्यामुळे नियमांचे पालन केल्यास एका दशकात हा प्रश्न सुटू शकतो. मात्र, सिब्बल यांच्या आक्रमक भूमिकेवर न्यायालयाने त्यांना जास्त उत्साहित होऊ नका, असा सल्लाही दिला.

यावेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 'गेटेड कम्युनिटी'चा मुद्दा उपस्थित केला. एखाद्या गृहनिर्माण संस्थेत कुत्रे असावेत की नाही, याचा निर्णय तिथल्या रहिवाशांनी मतदानाने घ्यावा, असे त्यांनी सुचवले. जर ९०% लोकांना कुत्रे नको असतील, तर १०% लोक त्यांच्यावर आपली इच्छा लादू शकत नाहीत असेही त्यांनी स्पष्ट केले.

## ज्ञानराधा मल्टीस्टेटचा ठेवीदार अविनाश बापू माने यांनी गळफास घेऊन केली आत्महत्या

प्रतिनिधी @ बीड

ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये ठेवी असलेले संतोष बापूराव माने राहणार बार्शी रोड बीड यांनी स्वतःची आपली शेती विकून ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये पैसे ठेवले होते परंतु ज्ञानराधा मल्टीस्टेट गेल्या दोन-तीन वर्षापासून बंद असल्यामुळे त्याच्यावर प्रशासकीय नेमणूक असल्यामुळे आता आपले पैसे भेटतात का नाही भेटतेत हा प्रश्न मनात धरून या अविनाश बापू माने या नावाच्या व्यक्तीने बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बीड तालुक्यातील गोळवाडी परिसरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली आहे या मुळे सर्वत्र शेक कळा पसरला आहे व सर्व ठेवीदारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे आता आपले देखील पैसे आपल्याला वापस मिळतात का नाही हा प्रश्न देखील आता सर्व ठेवीदारांना पडल्यामुळे आता याकडे प्रशासक साहेब कशाप्रकारे लक्ष देऊन सर्व ठेवीदारांना न्याय देतात हे देखील येणाऱ्या भविष्य काळामध्ये पाहणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे याबाबत महाराष्ट्र शासनाने देवा भाऊने गांभीर्याने लक्ष देऊन ठेवीदारांना कसे पैसे मिळतील याकडे स्वतः लक्ष घालावे असे महाराष्ट्रातल्या जनतेमधून बोलले जात आहे व या ज्ञानराधा मल्टीस्टेट वर चौकशी करून प्रॉपर्टी विकून ठेवीदारांचे पैसे सर्वांना देण्यात यावे असे ठेवीदारांमध्ये चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये होत तसेच आत्महत्या केलेल्या अविनाश माने यांचे आई वडील पत्नी भाऊ-बहीण इत्यादी यांच्याकडून मागणी होत आहे की अजून लोकांनी अशा आत्महत्या

(उर्वरीत पान २ वर)

## ११ जानेवारी रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट क संयुक्तच्या पूर्व परीक्षा

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट क संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकुण १२ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी एकूण २८५० उमेदवार बसलेले असून सदर परिक्षा सुरळीत पार पाडणेकरीता १२ उपकेंद्रप्रमुख, १२ मदतनीस, ४८ पर्यवेक्षक, १४६ समवेक्षक असे एकूण २१८ अधिकारी/ कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाव्दारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(उर्वरीत पान २ वर)

## धर्माबाद नगरपरिषद गटनेतेपदी ताहेर लतीफ पठाण यांची सर्वानुमते निवड



धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद नगर परिषदेत गटनेतेपदाची निवड प्रक्रिया नुकतीच शांततेत आणि सर्वानुमते पार पडली. या निवडीत मराठवाडा जनहित पार्टीचे ज्येष्ठ व अनुभवी नगरसेवक ताहेर लतीफ पठाण यांची नगरपरिषदेच्या गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. धर्माबाद शहरातील चाणाक्ष व अभ्यासू राजकारणी म्हणून ओळख असलेले ताहेर लतीफ पठाण गेल्या वीस वर्षांपासून सक्रिय राजकारणात कार्यरत आहेत. प्रभाग क्रमांक १ मधून सर्वाधिक मताधिक्याने सातत्याने निवडून येणारे ते एकमेव नगरसेवक असून मराठवाडा जनहित पार्टीचे महाराष्ट्र राज्य सचिव म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत.

शांत, संयमी, मनमिळाऊ स्वभाव आणि सर्वसामान्यांशी थेट संवाद ठेवणारे नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. गरिबीतून स्वकर्तृत्वाच्या बळावर राजकारणातील प्रवास घडवून आणणाऱ्या ताहेर पठाण यांनी आजच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत सकारात्मक आणि लोकाभिमुख राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास केला आहे.

नगरपरिषदेतील कामकाजाचा सखोल अनुभव, प्रशासकीय बाबींचे ज्ञान आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची कार्यपद्धती यामुळेच त्यांच्यावर पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नगरपरिषदेच्या सभागृहाची धुरा संयमीपणे सांभाळणारे सक्षम नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.ही निवड जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत तसेच नगराध्यक्ष

(उर्वरीत पान २ वर)

## आष्टी मतदारसंघात रोजगार हमीची कामे लवकरच सुरळीत सुरू होणार



विरोधकांनी स्टंटबाजी करू नये - आ. सुरेश धस

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेली वैयक्तिक व सार्वजनिक कामे लवकरच सुरळीतपणे सुरू होणार आहेत. दि. ३१ मार्चपर्यंत प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार असून, अपूर्ण कामांना प्राधान्याने पूर्ण केल्यानंतरच नवीन कामांना सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी दिली. ज्या लाभार्थ्यांनी कामे पूर्ण केली आहेत मात्र अद्याप निधी मिळालेला नाही, अशा कामांची तातडीने पाहणी करून खात्री केल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना निधी वितरित करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत. तसेच दि. १ एप्रिल २०२६ पासून 'विकसित भारत - जी राम जी' योजनेंतर्गत नवीन कामांना सुरुवात होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील सर्व प्रलंबित कामे सुरू होऊन मजुरांना रोजगार उपलब्ध होईल.

(उर्वरीत पान २ वर)

## एकाच दिवसात ३० लाख वृक्षलागवडीचा इंडियन बुक ऑफ रेकॉर्डचा ढोल, प्रत्यक्षात वृक्षांची उपेक्षा!

निदान दर्शनी भागातील रेल्वे स्टेशनवरील वाळलेल्या झाडांकडे जिल्हाधिकाऱ्यांनी विवेक जागा ठेवून पाहावे - डॉ. गणेश ढवळे





प्रतिनिधी @ बीड

हवामान बदल, प्रदूषण आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड केल्याचा गाजावाजा करण्यात आला. या उपक्रमाची इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याचा अभिमान व्यक्त करत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

मात्र, या वृक्षलागवडीचा खरा चेहरा वेगळाच असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.वृक्षलागवड ही केवळ इव्हेंट

(उर्वरीत पान २ वर)

## दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात दर्पणदिन साजरा

कु प्रियंका प्रशांत देशपांडेचा दर्पणकार कन्या पुरस्काराने सन्मान





प्रतिनिधी @ बीड

दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जिव्हाळा बेघर निवारा केंद्र या ठिकाणी बेघर,निराधार लाभार्थी यांना स्नेहभोजन देऊन दर्पण दिन साजरा करण्यात आला. संपादक तथा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी सामाजिक दायित्व स्वीकारत सामाजिक उपक्रमातून दर्पण साजरा केला.

बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र या ठिकाणी मान्यवरांच्या शुभहस्ते ६ जानेवारी रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दर्पण दिन साजरा करण्यात आला.यावेळी दैनिक दिव्य मराठीचे बीड जिल्हा व्यवस्थापक प्रशांत देशपांडे यांची कन्या कु. प्रियंका देशपांडे ही मुंबई हायकोर्टात वर्ग एक या पी ए पदावर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# प्रबुद्ध समाज बनविण्यासाठी नीतीवान माणूस बनणे गरजेचे - प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड

## महाविहार धम्मभूमी शिवणी येथे पौष पौर्णिमा व सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

महाविहार धम्मभूमी शिवणी येथे प्रत्येक पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना कार्यक्रम आयोजित केला जातो. ह्या पौष पौर्णिमेदिनी धम्मदेशना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड ( जे एन यु दिल्ली तथा अध्यक्ष मानवी हक्क अभियान) आपल्या मनोगतात म्हणाले की, प्रबुद्ध समाज बनण्यासाठी नीतिवान माणूस बनावे लागेल.सम्यक ज्ञानाने व पालनाने समाज धम्माशील बनू शकतो. माता रमाईचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बद्दलचा जिव्हाळा, प्रेम जसे होते तसाच जिव्हाळा,प्रेम क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामध्ये होता. या महान मानवाचे व मातेचे स्मरण सतत ठेवून आपल्या जीवनात शिक्षण हे नीतीवान माणूस घडण्यासाठी कसे महत्त्वाचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचितांच्या, बहुजनांच्या व सर्व स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाचे प्रणेते आहेत. तरी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे लक्षात ठेव स्व उधारा बरोबरच समाजाचे व देशाचे हित कसे साध्य करता येईल ह्याकरिता सतत प्रयत्नशील असली पाहिजे असे आग्रेपणे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास उपस्थित असलेले पूज्य भंते धम्मशील थेरो पु. पय्यावर्धन पु भंते बुद्धबोधी यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध प्रतिमेस पुष्प व दीप धुपाने पूजन करून सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सेवानिवृत्त सीईओ पी.व्ही. बनसोडे यांनी केले. व आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देऊन पुढील नियोजनाबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. संस्थेस अमेरिकेमध्ये उच्च पदावर कार्य करणारे प्रतीक देविदास तांगडे यांच्या आई-वडिलांनी संस्थेला आर्थिक दान दिले. तसेच भोजनदान देणारे सखाराम उजगरे व खीरदान देणारे राहुल सोनवणे तसेच आदिती तुकाराम कांबळे एम.बी.बी.एस. ही वैद्यकीय पदवी मिळवणाऱ्याचा संस्थेतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. पूज्य भिक्खु पय्यावर्धन आपल्या मुख्य धम्मदेशनेत म्हणाले की जगाला शांतीचा, समतेचा,संदेश देणारे व दुःखमुक्तीचा मार्ग दाखवणारे तथागत गौतम बुद्धांच्या जीवनात पौर्णिमेच्या दिवसाला अनन्य साधारण महत्व आहे. राजा बिंबीसाराने पौष पौर्णिमेला सम्यक संकल्प करून तथागतांना भिक्खु संघाकरिता वेळुवन दान केले होते. तरी तथागतांच्या उपदेशाप्रमाणे आपल्या जीवनात दानपारमीतेला उच्च स्थान देणे लक्षात घेऊन मानवाला, अति दुर्मिळ लाभलेले मानवी जीवन अरहंत पदाकडे वाटचाल करणे हे सर्वांच्या हिताचे आहे, अशी मोलाची धम्मदेशना देऊन वातावरण धम्ममय केले.कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे व बहुसंख्य सदस्य, बीड शहरातील व परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिकांची उपस्थिती होती . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते राजू जोगदंड यांनी व्यक्त केले. पूज्य भंते धम्मशील थेरो यांच्या आशीर्वाद गाथेने व शरणातयेणे कार्यक्रमाची सांगता झाली.



# व्यवस्थापन समितीची नवी कार्यकारिणी जाहीर



अध्यक्षपदी सचिन पाटील तर उपाध्यक्षपदी मालती सहाणे यांची निवड

शिराढोण ।प्रतिनिधी

शिराढोण येथील पीएमसी शाळेच्या जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडणुका नुकत्याच उत्साहात पार पडल्या. या निवडणुकीत सचिन पाटील यांची अध्यक्षपदी, तर मालती सहाणे यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीच्या निवडीमुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवे उपक्रम, तसेच पालक-शिक्षक समन्वय अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

अध्यक्ष सचिन पाटील यांनी शाळेच्या प्रगतीसाठी पारदर्शक व विद्यार्थीहिताच्या दृष्टीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला, तर उपाध्यक्ष मालती सहाणे यांनी मुलींच्या शिक्षणावर विशेष भर देण्याचे आश्वासन दिले.या निवडीबद्दल ग्रामस्थ, पालकवर्ग व शिक्षकांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी पाटील किरण पाटील उपसरपंच अमोल माकोडे नासेर पठाण गणेश महाजन सतीश शिंपले राजपाल देशमुख अशोक महाजन राहुल माने दीपक सहाणे तंटामुक्त अध्यक्ष अमोल नाईकवाडे प्रदीप जाधव सर नर्सिंग पाटील पी एम श्री जिल्हा परिषद प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक अहिरे सर केंद्रप्रमुख कांबळे सर रोडे सर राठोड होकेसर शिंदे सर आदी उपस्थित होते.

## संपादकीय....

### आव्हान प्रकल्पपूर्तीचे

लाखो प्रवाशांच्या वाढत्या संख्येचा विचार करून रेल्वे मंत्रालय आणि एमआरव्हीसीने विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. मात्र रेल्वेमार्गालगत झालेली अतिक्रमणे, जमीन उपलब्धता आणि अधिग्रहण यामुळे काही प्रकल्प रखडले आहेत. यामुळे प्रवाशांना गर्दीतून धक्के खात प्रवास करावा लागत आहे.

मुंबई उपनगरीय रेल्वेवर विविध पायाभूत सेवासुविधा निर्माण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने १९९९ मध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना केली. नवीन लोकल, रेल्वेमार्ग उभारणे, रेल्वे स्थानकांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एमआरव्हीसीवर सोपविण्यात आली. प्रकल्पांसाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार ५० टक्के निधी उपलब्ध करून देते. या निधीतून पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागात विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत, तर काही कामे प्रगतिपथावर आहेत. एमआरव्हीसीने हाती घेतलेले प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी येत असल्या तरी त्यावर मातही केली आहे. परंतु काही प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात अडथळे आहेत.

एमआरव्हीसीच्या स्थापनेनंतर मुंबईकरांचा रेल्वे प्रवास वेगवान करण्यासाठी मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्पाच्या (एमयूटीपी) विविध योजना तयार केल्या. या योजनेत नवीन लोकल, नवीन मार्गिका, रेल्वे रुळाजवळ बॅरिकेट, मार्गिका वाढविणे, स्थानकांचा कायापालट, नवीन स्थानके निर्माण करणे असे विविध प्रस्ताव तयार केले. एमआरव्हीसीने तयार केलेल्या एमयूटीपी १ टप्प्याला २००३-०४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात कुर्ला-ठाणे पाचवी, सहावी मार्गिका, बोरिवली-विरार तिसरी आणि चौथी मार्गिका, ९ डब्याच्या १०१ नवीन लोकल, प्रकल्पात बाधित होणाऱ्या १५ हजार ८५७ नागरिकांचे पुनर्वसन अशी विविध कामे मार्गी लावली. एमयूटीपीचा पहिला टप्पा मार्च २०१२ मध्ये पूर्ण झाला. यामुळे पश्चिम-मध्य रेल्वेमार्गावर १२ डब्याच्या लोकल सुरू झाल्याने प्रवाशांना गर्दीपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला.

एमयूटीपी १ मधील प्रकल्प मार्गी लागत असतानाच एमआरव्हीसीच्या एमयूटीपी २ टप्प्याला २००८-०९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात ठाणे-दिवा पाचवी, सहावी मार्गिका आणि अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्ग विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले आहे, तर मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावी मार्गिका, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते कुर्ला दरम्यानच्या पाचव्या- सहाव्या मार्गिकेचे काम प्रगतिपथावर आहे. सीएसएमटी ते कुर्ला पाचवा व सहावा मार्ग प्रकल्पाचा खर्च अंदाजे ८९१ कोटी रुपये आहे. हा प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. टप्पा १ मध्ये परळ ते कुर्ला हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य होते. मात्र जुने पूल आणि रेल्वे रुळालगतच्या झोपडपट्टीतील नागरिकांचे पुनर्वसन करण्यात विलंब झाल्याने आणखी काही महिने या प्रकल्पाची प्रतीक्षा प्रवाशांना करावी लागणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील परळ ते सीएसएमटी प्रकल्प जागेअभावी रखडला आहे. सध्या लांब पल्ल्याच्या मेल-एक्स्प्रेस गाड्या जलद मार्गावरून चालविण्यात येत असल्याने जलद लोकल सेवेवर परिणाम होत आहे. यामुळे याचा फटका मध्य रेल्वे प्रवाशांना सोसावा लागत आहे.

एमयूटीपी ३ टप्प्याला २०१६ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या टप्प्यात पनवेल-कर्जत उपनगरीय कॉरिडॉर, ऐरोली- कळवा उन्नत मार्ग, विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरण अशी महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत. पनवेल-कर्जत नवीन मार्गिकेचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते, तर ऐरोली-कळवा उन्नत मार्ग २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरणाचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणार होते. मात्र ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत, तर लोकलमधून पडून होणारे अपघात रोखण्यासाठी स्वयंचलित दरवाजाची लोकल या टप्प्यात सुरू करण्यात येणार होती. ही लोकल नवीन वर्षात सुरू होणार आहे.एमयूटीपी ३ ए टप्प्यात हार्बर मार्गिकेचा विस्तार गोरेगाव-बोरिवलीपर्यंत करण्यात येणार आहे. बोरिवली-विरार दरम्यान पाचवी, सहावी मार्गिका, कल्याण-आसनगाव दरम्यान चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर दरम्यान तिसरी आणि चौथी मार्गिका, तर लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलसाठी कल्याण यार्डची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच वातानुकूलित रेक उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात येणार आहेत. गोरेगाव-बोरिवली हार्बर मार्गिका विस्तार प्रकल्प ८९८ कोटी खर्चाचा असून सध्या या प्रकल्पासाठी भूमिसंपादनाचे काम प्रगतिपथावर आहे. हा प्रकल्प गोरेगाव ते मालाड दरम्यान मार्च २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, तर मालाड ते बोरिवली विभागात डिसेंबर २०२८ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

## तहसील कार्यालय, कळंब
## उघड देखावा

समस्त गावकरी शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांचेमार्फत श्री जुबेर मुक्तार शेख रा. शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांनी त्यांची मुलगी महेक जुबेर शेख यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे शिराढोण ता कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. १५/०४/२०१९ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. २५/०८/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, मी नामे सौ. चंदादेवी जवाहरलाल सारडा रा. काळा हनुमान ठाणा, बीड येथील रहिवासी असून माझे श्री छत्रपती राजश्री शाहू अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, शाखा मोंढा, पेठ बीड तालुका जिल्हा बीड. या बँकेत सेव्हिंग खाते आहे. त्याचा खाते नंबर ००२००२३०००१०३२३ असा आहे. सदरील खात्याचे मी बँकेकडून चेक बुक घेतलेले आहे. सदरील चेक बुक मधील चेक क्रमांक ६० ६८ ५ /६ ०६ ८७ / ६०६८८ अशा नंबरचे मी सही केलेले कोरे चेक शहरांमध्ये प्रवास करत असताना बॅगेसह हरवलेले आहे. सदरील नंबरचे चेक बँकेत वठविण्यासाठी आले असता ते वठविण्यात येऊ नयेत.कारण सदरील चेकचे दुरुपयोग होण्याची दाट शक्यता आहे.करिता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. कोणाला सदरील चेक सापडल्यास खालील पत्त्यावर आणि नंबर वर संपर्क करावा

**जाहीर प्रगटन देणार**
**सौ चंदादेवी जवाहरलाल सारडा,**
**काळा हनुमान ठाणा,पेठ बीड,**
**तालुका जिल्हा बीड.**
**मोबाईल नंबर ९४ २२ २४ ३४ ११**




धर्माबाद - येथील महादेव हनुमान मंदीरात श्री. अनंत महाराज बेलगांकर यांचा आशीर्वाद नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. संगिताताई बोल्लमवाड यांना मिळाला. यावेळी मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा भावी उपनगराध्यक्ष शंकर अण्णा बोल्लमवाड, नवनिर्वाचित नगरसेवक कृष्णा तिम्मापुरे,आर्चक श्री. बालाजी संगमकर सर , गोपाल बियाणी व इतर छायाचित्रात दिसत आहेत.

पान १ वरून...

**एकाच दिवसात ३०....**

म्हणून न करता, तिचे संगोपन व संवर्धन महत्त्वाचे असते. निदान बीड रेल्वे स्थानकाच्या दर्शनी भागातील लागवड केलेल्या झाडांची तरी जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उद्घाटनाच्या झगमगाटानंतर झाडांची दुरवस्था

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड शहरातील पालवण येथील नव्या रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या उद्घाटनापूर्वी रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य सिमेंट रस्त्याच्या कडेला १२ ते १५ फूट उंचीची झाडे लावण्यात आली होती. मात्र उद्घाटनाचा सोहळा संपताच या झाडांचे संगोपन पूर्णतः दुर्लक्षित करण्यात आले.आज त्या ठिकाणी अनेक झाडे पाण्याअभावी वाळून गेली, काही मोडून पडली, तर काही झाडे पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याकडे जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे.

पालकमंत्र्यांची दिशाभूल ?

जिल्हाधिकाऱ्यांनी वर्षभरात १ कोटी रोपे लावण्याचा संकल्प जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात वृक्षसंगोपनाची जबाबदारी झटकली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत पुढील चार वर्षांत १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले होते. मात्र हे स्वप्न फक्त कागदोपत्रीच पूर्ण केले जात असल्याचा आरोप आता पुढे येत आहे.इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून सन्मान स्वीकारण्यापेक्षा, जमिनीवर लावलेल्या झाडांचे प्राण वाचवणे अधिक गरजेचे आहे. वृक्षलागवडीचे इव्हेंट करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी आता तरी प्रत्यक्ष जबाबदारी घ्यावी, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

**दैनिक समर्थ राजयोग...**

पात्र ठरली आहे.बीड जिल्ह्यातील ती पहिली महिला आहे जिने मुंबई उच्च न्यायालयात हे पद स्वकर्तृत्वावर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मिळवले आहे. तिच्या या आगळ्यावेगळ्या सुयशाबद्दल दर्पण दिनाचे औचित्य साधून तिला दर्पणकार कन्या - २०२६ या पुरस्काराने सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह दामिनी पथकाचे प्रमुख तथा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव मॅडम यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार नारायण नागरे, पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्षा

पान १ वरून...

शेख आयेशा, जिल्हा परिषदेतील सहाय्यक लेखाधिकारी सौ.शिल्पा जेथलिया, श्री जेथलिया, सामाजिक कार्यकर्त्या स्वाधार केंद्राच्या अधीक्षिका आशा धनवडे यांच्यासह जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, महिला काळजीवाहक छाया सरोदे आदींच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**ज्ञानराधा मल्टीस्टेटचा...**

करायच्या आहेत म्हणून तात्काळ लवकरात लवकर प्रॉपर्टी विकून ठेवीदारांचे पैसे देण्यात यावेत तसेच या झालेल्या दुर्घटनेबद्दल प्रत्येक जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी आपले थोडक्यात मनोगत व्यक्त करताना सांगितले की ज्ञानराधाची प्रॉपर्टी तात्काळ जाहीर लिलावाद्वारे विक्री करून ठेवीदारांचे पैसे व्याजा सहित तात्काळ त्यांना परत करावेत नसता कायदा हातात घ्यावा लागेल असे देखील मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना थोडक्यात सांगितले आहे आता या वर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवाभाऊ कशाप्रकारे लक्ष देऊन या ठेवीदारांना न्याय देतात हे देखील पाहणे येणाऱ्या काळामध्ये गरजेचे असणार आहे असे सर्व बीड जिल्ह्यातील ठेवीदारांमधून बोलले जात आहे

**धर्माबाद नगरपरिषद...**

सौ. संगीता महेश (शंकर) बोलमवाड, व पार्टीचे अध्यक्ष महेश नारायण बोललमवाड उपाध्यक्ष मोईज सेट करखेलीकर, शेषेराव फडसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.नवनिर्वाचित गटनेते ताहेर लतीफ पठाण यांच्या निवडीचे शहरातील राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून जोरदार स्वागत करण्यात येत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली धर्माबाद नगरपरिषदेचे कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

**११ जानेवारी रोजी ..**

सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक ०६.०१.२०२६ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा केंद्राप्रमुख शिवकुमार स्वामी यांनी सदर परिक्षेचे अनुषंगाने प्रशिक्षण दिले.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणाताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.आयोगाच्या सूचनेनुसार सदर परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने

पान १ वरून...

दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा /अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे केवळ आवश्यक साहित्य उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील, तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणने आवश्यक आहे.उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणेबाबत याव्दारे सूचित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजे नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

**आष्टी मतदारसंघात रोजगार ...**

शेतकरी व मजुरांच्या रोजगाराची संपूर्ण व्यवस्था करण्यात आलेली असल्याने विरोधकांनी आंदोलनाची भाषा करून स्टंटबाजी करू नये, असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले. यासंदर्भात अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, अलीकडेच पंचायत समिती व तहसील कार्यालयात रोजगार हमी योजनेच्या आढावा बैठका घेण्यात आल्या. योजनेअंतर्गत पूर्वी मोठ्या प्रमाणात कामे मंजूर झाली असून, त्यातील काही कामे नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आले आहे. अशी नियमबाह्य कामे रद्द करून नियमानुसार असलेली अपूर्ण कामे प्रथम प्राधान्याने पूर्ण करण्यात येणार आहेत. एक मस्टर भरलेली कामे आधी सुरू करून त्यानंतर दोन-तीन मस्टर भरलेली कामे पूर्ण केली जातील. सर्व अपूर्ण कामे पूर्ण झाल्यानंतरच नवीन कामांना मंजुरी दिली जाणार आहे.

रोजगार सेवक, पीटीओ व तांत्रिक अधिकारी यांनी कोणत्याही लाभार्थ्याला आर्थिक अडचण निर्माण केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करून जिल्ह्याबाहेर बदली करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. लाभार्थ्यांकडून कोणतीही बेकायदेशीर मागणी झाल्यास तात्काळ माहिती देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

रोजगार हमी योजनेतील महत्त्वाचा घटक असलेल्या रोजगार सेवकांच्या कार्यपद्धतीत काही ठिकाणी विसंगती आढळून आली असून, ग्रामपंचायत स्तरावर काम मागणी अर्ज, ऑनलाईन मस्टर, वेज लिस्ट व इतर प्रक्रिया पारदर्शक आणि सुसूत्रपणे राबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. अनुसूचित जाती-जमाती, बचत गट तसेच विधवा महिलांसाठी शेळीपालन शेड उभारणीची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मजुरांच्या रोजगारासाठी आंदोलनाचा इशारा देणे ही केवळ स्टंटबाजी असून, सर्व कामे लवकरच सुरळीत सुरू होणार असल्यामुळे आंदोलनाची गरज उरलेली नाही, असेही आ. सुरेश धस यांनी शेवटी नमूद केले.

## तहसीलदार आणि कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी

### जाहीर प्रगटन

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये**

सर्व जनतेस मौजे चिंचाळा ता. आष्टी जि. बीड यांना जाहीर केले जाते की, अर्जदार नामे श्री. कल्याण कुंडलीक पोकळे रा. चिंचाळा ता. आष्टी जि. बीड यांनी मौजे चिंचाळा शिवारातील सं.न.३९/अ/ क्षेत्र १८ ए. १० गुंठे असून त्यांचे पुर्वीचे स.न.३९ चे ७ पोट हिस्से अस्तित्वात होते. सन ९६९ पर्यंत पुढे सदर सर्व्हेचे विशेष जिल्हा निरीक्षक भूमीअभिलेख (दशमान) नांदेड/उस्मानाबाद यांनी सदर मौजे चिंचाळा गावातील मोजणी करुन सदर स.न.३९/अ चे ९ पोट हिस्से केले. हिस्सा फार्म ७ तयार केला. वहिवाटी प्रमाणे पो.हि. क्षेत्र कमी जास्त लागले असून क्षेत्र १७ ए.३० गुं. लागले. तसेच सदर सर्व्हे नंबर नकाशा तयार करुन त्यामध्येही ९ (नऊ) पो.हि. दर्शविण्यात आले आहे. पुढे सदर सव्हे नं. ३९ चे एकर गुंठ्यात रुपांतर फेर क्र. ६४ ने हे. आर. प्रमाणे दर्शविण्यात आले. त्या प्रमाणे ७/१२ चे क्षेत्र निश्चित करण्यात आले. पुढे सर्व्हे न. चे रुपांतर गटामध्ये दर्शविण्यात आले परंतू पुर्वीचे ९ पोट हिस्से असतांनी गटामध्ये एकूण १० पोट हिस्से करण्यात आले आहे. व त्याचे एकुण क्षेत्र १८ ए.१० गुंठे लागले आहे. गटाचे अवलोकन केले असता त्यामध्ये आज रोजी गट कक्ष्य क्र. ३९/अ/३ व ३९/अि/३ मध्ये दोनी गटात क्षेत्र ०.६० आर समान लागलेले आहे. दोन्ही गटामध्ये १) सिताराम जगन्नाथ पोकळे क्षेत्र ०.१५ आर फेर क्र. ६९७, २) लक्ष्मीबाई गोरख पोकळे क्षेत्र ०.४५ आर, फेर क्र. ८५७ ने नमुद आहे. या दोघांनी गट क्र. ३९/अि/३ मध्ये जमीन खरेदी केलेली आहे. परंतु त्यामध्ये क्षेत्र ०.६० आर जमीन नावावर आहे. नजर चुकीने त्याचे नाव गट क्र. ३९/अ/३ मध्ये लागण्यात आले आहे. क्षेत्र ०.६० आर मध्ये जमीन मालक विनायक गोविंद (मयत) यांची मोजे चिंचाळा येथे एकुण ८ ए. ४ गुं. सर्व्हे नं. ३९/आ मध्ये जमीन होती. त्यापैकी ६ ए.२ गुंठे इसार पावती आधारे छगन बाबु, आबा सखाराम, किसन नाना, कुंडलिक आप्पा, अनंदा सखाराम हे वहातात.

परंतू कुंडलीक आप्पा सोडून इतर खातेदाराने जमीन नावावर करुन घेतल्या तरी आज रोजी कुंडलिक आप्पा मयत त्याचे वारस अर्जदार हे सदर जमीन १९५७ पासून आज तगायात पर्यंत जमीन वहीत करीत आहेत. प्रत्यक्ष जायमोक्यावर आज रोजी ही क्षेत्र ०.६० आर जमीन शिल्लक असुन आजरोजी अर्जदार याचे वहिती कब्जात आहे.

मुळ मालक विनायक गोविंद (मयत) असून त्याचे वारसदार हि सदर जमीनवहित करीत नाहीत. सदर मुळ मालकाचे वारसदार हि ३० ते ४० वर्षापासून गाव सोडून गेलेले आहे. सदर जमीन क्षेत्र ०.६० आर जमीन आज रोजी इसार पावती खातेदार कुंडलीक आप्पा पोकळे (मयत) असून त्यांचेवारसदार अर्जदार हे सदर जमीन गेली ६५ वर्षापासून आज तगायत वहिती करत आहेत.तरी प्रत्यक्ष वहिवाटी प्रमाणे ७/१२ चे मालकी हक्कात आमचे अर्जदाराचे नावे नोंद घावी अशी विनंती केली आहे.करिता प्रकरणाशी संबंधितांस याद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणी काही आक्षेप अथवा म्हणणे असल्यास सदरचे जाहीरप्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून आपले लेखी म्हणणे व पुरावे सादर करावेत. विहित वेळेत आक्षेप अथवा म्हणणे सादर करण्यास स्वतः माझे समक्ष हजर न झाल्यास पुढील नियमाधीन उचित कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०५/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला.

**स्वाक्षरित/–**
**तहसीलदार, आष्टी**

# नगर परिषद निवडणूक खर्चाची हिशेब सादर करण्याचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणूक-२०२५ अंतर्गत निवडणूक लढवलेल्या उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाचा तपशील ठराविक कालावधीत सादर करावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बीड यांनी केले आहे.

भारतीय लोकप्रतिनिधी अधिनियमातील तरतुदीनुसार निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र दाखल केल्यापासून मतमोजणी दिनांकापर्यंत झालेल्या निवडणूक खर्चाचे हिशोबे विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार डिसेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व २६ प्रभागांतील निवडणूक लढवलेल्या उमेदवारांनी आपला खर्चाचा तपशील दि. ०४ डिसेंबर २०२५ ते दि. ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत नोटीसनुसार सादर करणे आवश्यक आहे.

अद्याप काही उमेदवारांनी आपला खर्चाचा तपशील सादर केलेला नसल्यास त्यांनी तात्काळ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात हजर राहून आवश्यक कागदपत्रांसह खर्चाचा हिशोब सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर आदेशाचे पालन न केल्यास संबंधित उमेदवारांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.ज्यांनी हिशोब सादर केलेला आहे त्यांनी ते त्वरित सादर करावेत असे आवाहन उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी केले आहे.

# आष्टी तहसीलसमोर आज बेमुदत धरणे आंदोलन

आष्टी (प्रतिनिधी)

अतिवृष्टीमुळे आष्टी, पाटोदा व शिरूर विधानसभा मतदारसंघातील बंधारे, रस्ते, नदीवरील पूल तसेच पाझर तलावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या सर्व कामांची तात्काळ दुरुस्ती करावी, तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत बंद असलेल्या विहिरी त्वरित सुरू करून त्यांचे बंद मस्टर चालू करावेत,



या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी आज गुरुवार, दि. ८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आष्टी तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व आष्टी, पाटोदा व शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे करणार आहेत. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी अडचणीत सापडला असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, यासाठी हे आंदोलन महत्त्वाचे असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०९/२०२६**

रामप्रसाद पि.रामा उर्फ रामू जाधव वि.निरंक

**(मार्फत–अॅड.एस.डी.कुलकर्णी,गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **रामा लिंबाजी जाधव हे दि.१७.१०.२०२२ रोजी मौजे रूई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **रामप्रसाद पि.रामा उर्फ रामू जाधव वय–४४ वर्षे, धंदा–शेती, रा.रूई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **रामा लिंबाजी जाधव** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०५/०१/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०९/०२/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५०७ दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री भागवत सदाशिव भिंगारे, रा.नागोण्याची वाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सृष्टी भागवत भिंगारे | मुलगी | १५.०६.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

### जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकरदन यांचे न्यायालयात**

**विशाल सुभाष पांडे**

**विरूध्द**

**ग्रामसेवक ग्रा.पं.तडेगांववाडी ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे विशाल सुभाष पांडे रा.तडेगांववाडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **देवून त्यांनी त्यांची मुलगी काव्या सुभाष पांडे यांचा जन्म दिनांक २९.०७.२००८ रोजी मौजे तडेगांववाडी** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.३१.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/–**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

### जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकरदन यांचे न्यायालयात**

**रूपाली देवसिंग बालोद**

**विरूध्द**

**ग्रामसेवक ग्रा.पं.तडेगांववाडी ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे रूपाली देवसिंग बालोद रा.तडेगांववाडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **देवून त्यांनी त्यांचा मुलगा राणाजी देवसिंग बालोद यांचा जन्म दिनांक ०३.०१.२०११ रोजी मौजे तडेगांववाडी** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.३१.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/–**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१३६६ दि.२१.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **गणेश विठ्ठलराव टोपे, रा.नागोण्याचीवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राधिका गणेश टोपे | मुलगी | ११.०१.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २१/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि– दि.२९.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शिवाजी रामभाऊ शिंदे, रा.नागोण्याचीवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निकीता शिवाजी शिंदे | मुलगी | २९.०९.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७४० दि.०८.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री अय्यास कादर कुरेशी, रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ह्वअय्यास कादर कुरेशी | स्वतः | ०३.०१.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१४७८ दि.२१.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री किशोर श्रीराम पाटोळे, रा.मसई ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | वीर किशोर पाटोळे | मुलगा | १०.०७.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २१/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५३० दि.२९.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अजय शंकर पवार, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गोपाल अजय पवार | मुलगा | १५.१२.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५३१ दि.२९.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अजय शंकर पवार, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विठ्ठल अजय पवार | मुलगा | ०५.०५.२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५५७ दि.२३.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री अंकुश रमेश भालेराव, रा.आलमगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक अंकुश भालेराव | मुलगा | २६.०६.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५५९ दि.२३.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री अंकुश रमेश भालेराव, रा.आलमगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राजेश्री अंकुश भालेराव | मुलगी | २६.०६.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१२४२ दि.२६.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शेख मियाँ बाबामियाँ, रा.चिंचखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख मियाँ बाबामियाँ | स्वतः | १६.०४.१९५६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २६/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–७६७ दि.०८.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुख्तार सत्तार मोमीन, रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुख्तार सत्तार मोमीन | स्वतः | १४.०३.१९९१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# बीडमध्ये महिला उद्योजकतेचा महाकुंभ! ८० स्टॉल्स, लाखांची उलाढाल






## नवनिर्वाचित नगरसेवक, पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव; सोनल अरविंदसिंह पाटील यांचा स्तुत्य उपक्रम

बीड: प्रतिनिधी

बीडच्या उद्योग क्षेत्रात महिलांनी आता आपली ताकद दाखवून दिली आहे. तेजस्विनी ग्रुपच्या संचालिका सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या कल्पकतेतून आयोजित महिला उद्योजकांच्या भव्य प्रदर्शनाने यशाचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. रामकृष्ण लॉन्स येथे पार पडलेल्या या प्रदर्शनात केवळ गर्दीच झाली नाही, तर लाखोंची उलाढाल होऊन महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा पायंडा रचला गेला.

राज्यातून ७० ते ८० स्टॉल्सचा सहभाग नोंदविले

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे केवळ स्थानिकच नव्हे, तर पुणे, अकोला, लातूर, संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहरांतून आलेल्या महिला उद्योजिका! प्रदर्शनात एकूण ७० ते ८० स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये हाताने बनवलेली तोरणे, दागिने, मसाले, मकर संक्रांती विशेष वाण, साड्या ,कपडे, साडी ज्वेलरी, गृह सजावटी चे सामान, ऑरगॅनिक फूड, मशरूम आणि घरगुती खाद्यपदार्थांचा समावेश होता.

कर्तृत्ववानांचा यथोचित सन्मान म्हणून

याच कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक भान जपणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. प्रदर्शनादरम्यान नवनिर्वाचित नगरसेवक, पत्रकार आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांचा सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजाच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या या घटकांना सन्मानित करून तेजस्विनी ग्रुपने एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

येणाऱ्या मकर संक्रांती सणाचे औचित्य साधून महिलांसाठी खरेदीचे हे मोठे दालन उभे करण्यात आले होते. संक्रांतीसाठी लागणारे वाण, तीळ-गूळ आणि इतर गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी बीडमधील तब्बल ५ ते ७ हजार महिलांनी या प्रदर्शनाला हजेरी लावली. एकाच छताखाली सर्व दर्जेदार वस्तू मिळाल्याने ग्राहकांनीही समाधान व्यक्त केले.

दिवसभर चाललेल्या या प्रदर्शनात स्टॉलधारकांची मोठी विक्री झाली. अनेक महिला उद्योजिकांनी एकाच दिवसात हजारो रुपयांची विक्री केल्याने प्रदर्शनात लाखोंची उलाढाल झाली. तेजस्विनी ग्रुपमुळे आम्हाला हक्काची बाजारपेठ मिळाली, अशा शब्दांत पुणे आणि अकोल्याहून आलेल्या स्टॉलधारकांनी आपला आनंद व्यक्त केला. सर्वच स्टॉलधारक या प्रतिसादाने अतिशय खुश दिसून आले. महिलांनी आत्मनिर्भर व्हावे हीच आमची जिद्द आहे. संक्रांतीच्या निमित्ताने महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देता आले आणि समाजातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा सन्मान करता आला, याचे समाधान मोठे आहे. अशी प्रतिक्रिया - सोनल अरविंदसिंह पाटील (संचालिका, तेजस्विनी ग्रुप) यांनी दिली.

शहरातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठीत नागरिकांनी भेटी देऊन तेजस्विनी ग्रुपच्या कार्याचे कौतुक केले. सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कार्यामुळे शेकडो महिला स्वकर्तृत्ववान बनल्या असून, या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव या भव्य उपक्रमाला मिळाला.




# नाळवंडीच्या उर्वरित रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू-आ.विजयसिंह पंडित

## नाळवंडी नाक्यावरी ६३ लाख रुपये किंमतीच्या रस्ताकामाचे उद्घाटन

बीड (प्रतिनिधी)

नाळवंडी नाका ते नाळवंडी रस्त्यावरील ६४ लाख रुपय किंमतीच्या रस्ता कामाचे उद्घाटन आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले आहे. सदर काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्यात येत असून उर्वरित नाळवंडी रस्त्याच्या कामाचा प्रश्न देखील राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मार्गी लावू अशी ग्वाही यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी नाळवंडी नाक्याच्या पुढे ते उड्डान पुलापर्यंत रस्ता कामासाठी व नळकांडी पुलासाठी ६३ लाख रुपयाचा निधी जिल्हा वार्षिक विकास योजनेअंतर्गत दिलेला आहे. या रस्ता कामाचे उद्घाटन मंगळवार दिनांक ६ जानेवारी रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, नगरसेवक दत्ता जाधव, अरिफ खान, नगरसेवक शेख निजामभाई, आनंद पवार, भाऊसाहेब डावकर, इनामदार खय्युम, ईश्वर पवार, बाबूलाल पवार, संतोष जाधव, विलास घनवट, अनिल देवकर, संजय इटकर, अनिल पवार यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या माध्यमातून विकास कामांना गती येत आहे. नाळवंडी नाका ते नाळवंडी या रस्त्यासाठी अनेक वेळा आंदोलने झाली. खरंतर हा रस्ता पूर्वीच होणे गरजेचे होते परंतु तसे झाले नाही. आता हा रस्ता जिल्हा वार्षिक नियोजन मधून ९०० मीटर होत आहे पुढे या रस्त्यावर एक पूल असून त्याबरोबर उर्वरित रस्त्याचे काम देखील राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या माध्यमातून लवकरच मार्गी लावू, रस्ता कामांमध्ये गुणवत्ता आणि दर्जा घसरता कामा नये अशा सूचनाही आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या .यावेळी नाळवंडी रोडवरील खडी क्रेशर चालक संघटनेच्यावतीने बीड नगरपालिकेत आ. विजयसिंह पंडित यांना मोठ्या प्रमाणात यश आल्याबद्दल त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

# कॉंग्रेसचे माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचे निधन



पुणे ।प्रतिनिधी

दि. ६ जानेवारी माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंतिम संस्कार करणात येणार आहेत. कलमाडी याच वयाच्या ८२ व्या वर्षी आज नियन झालं. काही दिवसांपासून ते आजारी होते. भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून सेवा बजावताना त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला होता. निवृत्तीनंतर ते राजकारणात सक्रीय झाले. १९८२ ते १९९६ अशी सलग १४ वर्ष, आणि नंतर १९९८ ते २००४ या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. १९९६ मये लोकसमेत निवडून गेले होते. कॉंग्रेसच्या सत्ताकाळात त्यांनी रेल्वे खात्याचं मंत्रीपद सांभाळलं.

ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्षही होते. राष्ट्रकुल स्पर्धाच्या आयोजनात भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धका बसला होता. गेल्या वर्षी सक्तवसुली संचालनालयाने दिलेल्या अहवालानंतर त्यांची आरोपातून मुक्तता झाली होती. पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नत्री दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली. कलमाडी यांच्या निधनाबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

# नगराध्यक्षा प्रतिनिधी शेख मुजीबभाई यांच्या पुढाकाराने शहरात स्वच्छता मोहीम


## गैरहजर ८ कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

बीड (प्रतिनिधी) : बीड नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेमलताई परवे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहर स्वच्छतेला प्राधान्य देत व्यापक स्वच्छता मोहिमेस सुरुवात केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज सकाळी शहरातील विविध भागांत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या मोहिमेत नगराध्यक्षा प्रतिनिधी शेख मुजीबभाई, नगरसेवक शेख निजाम यांच्यासह पालिकेचे स्वच्छता कर्मचारी सहभागी झाले होते. जेसीबी, ट्रॅक्टर आदी यंत्रसामग्रीच्या साहाय्याने भाजी मंडई, बशीरगंज, आदी भागांतील नाल्यांमध्ये साचलेला गाळ व कचऱ्याचे ढिगारे हटविण्यात आले. विशेषतः न्यू भाजी मंडई परिसरात विविध ठिकाणी साचलेला कचरा पूर्णतः साफ करण्यात आला.या वेळी नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक, मुकादम व अन्य कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत सहकार्य केले.

या स्वचछता मोहिमेमुळे परिसरातील अस्वच्छता दूर होऊन आरोग्याच्या दृष्टीने अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविण्यात येतील, असा विश्वास नगराध्यक्षा प्रेमलताई परवे यांच्या वतीने व्यक्त करण्यात आला.





### बीड नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील ८ कर्मचारी सातत्याने गैरहजर; कारवाईचे संकेत

बीड नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील आठ कर्मचारी सातत्याने गैरहजर असल्याचे निदर्शनास आले असून, या गंभीर प्रकाराची नोंद नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे. याबाबत वारंवार सूचना देऊनही संबंधित कर्मचारी अद्याप कामावर हजर न राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर, सातत्याने गैरहजर असलेल्या आठ कर्मचाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला असून, तो प्राप्त झाल्यानंतर लवकरच शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत नगरपरिषदेच्या प्रशासनाने दिले आहेत.

# प्रहार शेतकरी संघटनेला नवे नेतृत्व तालूकाध्यक्ष मनोज खिंडरे, शहरध्यक्ष सोमनाथ वाघयारे यांची निवड





किल्ले धारूर (प्रतिनीधी)

प्रहार शेतकरी संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी श्री. मनोज अनंतराव खिंडरे व शहरध्यक्ष सोमनाथ वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.शेतकरी हितासाठी सातत्याने कार्यरत असलेले, तळागाळातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणारे

आणि संघटन कौशल्याने ओळखले जाणारे मनोज खिंडरे व सोमनाथ वाघमारे यांच्यावर प्रहार जनशक्ती पक्षाने दाखवलेला विश्वास ही बाब निश्चितच गौरवास्पद आहे.त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अधिक प्रभावी न्याय मिळेल, तसेच प्रहार जनशक्ती पक्ष,प्रहार दिव्यांग क्रांती,प्रहार शेतकरी संघटनेचे कार्य अधिक जोमाने पुढे जाईल,अशी आशा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

या निवडीबद्दल प्रहार शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधवांनी मनोज खिंडरे, व सोमनाथ वाघमारे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

त्यावेळी शिवसेना ता.अध्यक्ष बाळू कुंरूद (शिंदे गट)प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा सरचिटणीस हनुमत तोंडे,(उ.बा.ठा.गट) ता.अध्यक्ष बाबासाहेब सराफ प्रहारचे शहरध्यक्ष बापू सिरसठ,ता.उपाध्यक्ष विष्णू चोले ,सचिव,अशोक ईगोले आदी प्रहारचे कर्यकर्त्ये उपस्थित होते.

# जगात पत्रकारितेला आढळ स्थान -त्रिंबक पवार

## माझा गौरव गेवराईकरांचा सन्मान नूतन नगराधक्ष्या -गीता त्रिंबक पवार



पत्रकारांनी सदैव मला साथ दिली - मा. राज्य मंत्री बदामराव पंडित

गेवराई (प्रतिनिधी)

आज जागतिक स्तरावर जर विचार केला तर दोन देशांमध्ये युद्ध सुरू झाल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत . या सर्व जागतिक स्तराचा विचार केला असता युद्ध शांत करण्यासाठी आणि सत्य माहिती जगासमोर मांडण्यासाठी पत्रकारितेचे अढळ स्थान आहे ,असे प्रतिपादन लोकनेते बाळराजे पवार यांनी केले तर पत्रकारांनी मला नेहमीच सहकार्य केलेले आहे, असे मत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मांडले .

नगर परिषदमध्ये मिळालेले यश केवळ गेवराईकरांच्या प्रेमामुळेच अशा भावना नूतन नगराध्यक्षा सौ . गीताभाभी पवार यांनी व्यक्त केल्या . निमित्त होते गेवराई तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवन गेवराई येथे ६ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या दर्पण दिन सोहळ्याच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, लोकनेते बाळराजे पवार, पोलीस उपविभागीय अधिकारी अनिल कटके, न.प. मुख्याधिकारी विक्रम मांडुरके ,पोलीस निरीक्षक किशोर पवार, युवा नेते राजेंद्र मोटे, रोहित पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .उपस्थित मान्यवरांचे स्वागत पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, उपाध्यक्ष सखाराम शिंदे, सचिव दिनकर शिंदे, कोषाध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्रसाद कुलकर्णी आदींनी केले. प्रास्ताविकात ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी पत्रकार भवन जागा मिळवणे, बांधकाम व पत्रकार भवन उभारणी तसेच पत्रकाराचे समाजातील स्थान या विषयावर उहापोह केला . त्यानंतर नूतन नगराध्यक्ष सौ गीता त्रिंबक पवार यांच्यासह वीस नगरसेवकांचा यावेळी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. पत्रकार संघाने तयार केलेल्या गौराई या स्मरणिकेचे आणि पत्रकार गोपाल चव्हाण यांच्या यमाई दिनदर्शिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले . कार्यक्रमात पत्रकार दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे, सचिव प्रवीण जैन, संचालक राजेंद्र डेंगे, डॉ . किशन देशमुख, प्रशांत घोटणकर, सुरेंद्र रुकर, रामदास शिंदे यांच्या हस्ते उपस्थित सर्व पत्रकारांना सन्मानचिन्ह देऊन गौरवांकित करण्यात आले . यानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आपल्या भाषणात मी जेव्हापासून राजकारणात आलो तेव्हापासून पत्रकार माझ्यासोबत होते . त्यांच्या सूचना आणि मार्गदर्शनाने मी आजवर यशस्वी राजकारण करत आहे, असे ते म्हणाले. प्रमुख भाषणात लोकनेते बाळराजे पवार यांनी पत्रकार भवनाचा इतिहास सांगत ग्रामीण पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पत्रकारांचे योगदान, पत्रकारांचे महत्त्व, प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचे स्थान याबाबत आपले मत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्षा सौ . गीताभाभी पवार म्हणाल्या की, गेल्या अनेक वर्षापासून मी गेवराई शहरातील माता भगिनी व नागरिकांच्या सेवेसाठी सदैव कार्यरत असल्याचे व प्रत्येकाच्या अडीअडचणी सोडविण्याचा मी प्रयत्न केलेला आहे . त्याचेच फळ म्हणून नगरपालिकेची सत्ता पूर्णपणे आपल्या ताब्यात गेवराईकरांनी दिली आहे .त्यांच्या या ऋणात राहून त्यांचे ऋण व्यक्त करण्याची संधी मला भावी काळात देण्यात यावी, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. मुख्याधिकारी विक्रम मांडुरके आणि पोलिस उपाधिक्षक अनिल कटके यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या . दरम्यान आमदार विजयसिंह पंडित यांनी पत्रकार भवनात उपस्थित राहून पत्रकारांना शुभेच्छा दिल्या .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार प्रा . राजेंद्र बरकसे यांनी केले . दर्पण दिनाच्या या कार्यक्रमास अनिल बोर्डे, जान मोहम्मद बागवान, कडूदास कांबळे, कॅप्टन एस.पी. सूर्यवंशी ,माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, संतोष गर्जे, सय्यद एजाज, मुख्याध्यापिका वंदना हिरे, कैलास जोगदंड , संदीप मडके नवीद मशायक , बाबुराव नागरगोजे, राजेंद्र मनोर यांच्यासह पत्रकार ड हारुण शेख, गजानन चौकटे, शेख इरशाद, सुदर्शन देशपांडे, दत्ता वाघमारे, लक्ष्मण राऊत, अलताफ कुरेशी, अजहर इनामदार, लक्ष्मण आहेर, लक्ष्मण राऊत,भरत खराद, धनंजय बजगुडे, श्रीराम बाराहत्ते, रामकिसन तळेकर, गोपाल चव्हाण, मनोज आहेर, विजय नाटकर, कालिदास काकडे, सुरेश गांधले, सुनिल मिसाळ, रघुनाथ थोरात, लक्ष्मण उमाप , लक्ष्मण सरपते, सय्यद मुदस्सीर, सतिष वाघमारे बरोबरच शहरातील नागरिक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# अंकुशराव टोपे महाविद्यालयात युवती सक्षमीकरण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जालना ।प्रतिनिधी

जालना मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना व रोटरी क्लब जालना रेनबो यांच्या संयुक्त विद्यमाने मा.आ. राजेशभैय्या टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित युवती सक्षमीकरण कार्यशाळा उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली. या कार्यशाळेत महाविद्यालयातील सुमारे १५० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. राहुल पाटील यांनी विद्यार्थिनींना सकस आहार आरोग्य आणि जीवनशैली याविषयी सखोल व उपयुक्त मार्गदर्शन केले.तर डॉ. रवींद्र बेदरकर यांनी विद्यार्थिनींना सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी सजग राहून प्रयत्नशील बनावे असे आवाहन केले.कार्यक्रमात श्री.दत्ता पवार व अनिकेत भुतेकर यांनी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक सादर करत विद्यार्थिनींना प्रत्यक्ष अनुभवातून आत्मरक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वासाची नवी ऊर्जा निर्माण झाली.ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी रोटरी क्लब जालन्याच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्डा,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील,उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विद्यार्थिनी विकास समितीच्या प्रमुख डॉ.सीमा निकाळजे यांनी मांडली,तर डॉ.प्रतिभा श्रीपत यांनी विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कांचन मुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. वाडेकर यांनी केले.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यालयीन अधीक्षक श्री.सुरेश चव्हाण,डॉ. सुजता देवरे,प्रा.रामप्रसाद भालेकर,डॉ.शंकर तिकांडे, प्रा. संगीता गाभूड,डॉ.सुजता पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली होती.

# मौजे बारसवाडा येथे सात दिवस चाललेल्या भागवत कथेचा भक्तिभावात सांगता

अंबड ।प्रतिनिधी

मौजे बारसवाडा येथे दि. ७ जानेवारी २०२६ रोजी सात दिवस चाललेल्या भागवत कथेचा भक्तिमय वातावरणात सांगता मोठ्या उत्साहात पार पडला. या सांगता सोहळ्यात भागवताचार्य उमेश महाराज गोंदीकर यांच्या मधुर वाणीने भागवत कथेचे निरूपण करण्यात आले. सांगता कार्यक्रमावेळी भागवताचार्य उमेश महाराज गोंदीकर व यजमानांच्या हस्ते भागवत कथेची महापूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण परिसर हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. भागवत कथेच्या माध्यमातून उमेश महाराजांनी कलियुगात भागवत कथा श्रवणाचे अनन्यसाधारण महत्त्व विषद करत श्रद्धा,सदाचार व भक्तीमार्गाचा संदेश दिला. त्यांच्या प्रभावी प्रवचनामुळे



## उमेश महाराज गोंदीकर यांच्या काल्याचे कीर्तन;भाविकांची मोठी गर्दी

उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या पवित्र कार्यक्रमासाठी बारसवाडा गावासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांगता सोहळ्याने गावात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी आयोजक व यजमानांचे मनःपूर्वक आभार मानले.

# साईज्ञान इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयती उत्साहात साजरी



आष्टी (प्रतिनिधी)

दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित साईज्ञान प्राथमिक व माध्यमिक इंग्लिश स्कूल, आष्टी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास संस्थेचे मा. अध्यक्ष सुखदेव पोकळे साहेब प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन गांदले नरेश देविदास तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले होते.

जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी शाळेच्या शिक्षिका श्रीमती नजान अश्विनी बाबू यांनी अध्यक्षपद भूषविले. तर श्रीमती आजबे मॅडम व गांगर्डे मॅडम यांनी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमास शाळेचे विद्यार्थी, शिक्षक तसेच इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या दरम्यान संस्थेचे मा. अध्यक्ष सुखदेव पोकळे साहेब यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके तसेच शैक्षणिक साहित्य (कंपास, पेन्सिल, शॉपनर, इरेझर इत्यादी) यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा तसेच त्यांच्या विचारांचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित व्हावे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे मुख्याध्यापक काशीद एस. वाय. यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले. अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपल्याची घोषणा करण्यात आली. अशा प्रकारे साईज्ञान इंग्लिश स्कूल, आष्टी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीपणे पार पडली.

# विरेगाव येथे भव्य मोफत सर्वरोग निदान शिबिर संपन्न

## राजेशभैय्या टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य सेवेचा जागर; संजिवनी हॉस्पिटल व अमोल जाधव यांचा पुढाकार

जालना ।प्रतिनिधी

माजी आरोग्यमंत्री आमदार राजेशभैय्या टोपे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विरेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिरा ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या शिबिरात सुमारे ४०० रुग्णांची प्राथमिक तपासणी करण्यात आली तर १७५ गरजूंना मोफत एउऋ सुविधेचा लाभ देण्यात आला. दिमाखदार उद्घाटन सोहळा संजिवनी मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल आणि विरेगावचे माजी सरपंच अमोल जाधव यांच्या संयुक्त विद्यमानाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन खुद्द ना. राजेशभैय्या टोपे यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी प. पू. सुरकांतेश्वर महाराज यांची पावन उपस्थिती लाभली तर डॉ. बलीराम बागल यांची विशेष उपस्थिती होती.परिसरातील अनेक मान्यवर आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या सोहळ्याला मोठी गर्दी केली होती.अत्याधुनिक तपासणी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग



सकाळी ८ वाजेपासून सुरू झालेल्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची बारकाईने तपासणी केली. यामध्ये प्रामुख्याने खालील आजारांवर उपचार व सल्ला देण्यात आला हृदयविकार बीपी आणि १७५ रुग्णांचे मोफत ईसीजी .इतर तपासण्या मधुमेह शुगर, दमा,मूत्रविकार आणि स्त्रीरोग तपासणी.बालरोग लहान मुलांच्या आरोग्याची विशेष तपासणी.या मोहिमेत डॉ. कैलास राजगुरु, डॉ. निशांत गोयल, डॉ. तुषार अग्रवाल, डॉ. अतुल काळे, डॉ. शशिकला काळे, डॉ. सागर झावर आणि डॉ. सुर्से या नामांकित डॉक्टरांनी आपली सेवा दिली.पुढील उपचारांसाठी मदतीचा हात शिबिराचे व्यवस्थापन डॉ. बलीराम बागल यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडले. केवळ तपासणीच नव्हे तर ज्या रुग्णांना पुढील शस्त्रक्रिया किंवा गंभीर उपचारांची गरज आहे, त्यांना संजिवनी हॉस्पिटलमध्ये प्राधान्याने उपचार देण्याचे आश्वासन यावेळी आयोजकांनी दिले.ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी आणि गंभीर आजारांचे वेळीच निदान व्हावे हाच आमचा मुख्य उद्देश आहे.

आयोजक समिती विरेगाव

या शिबिरामुळे विरेगावसह परिसरातील गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून वाढदिवसानिमित्त राबवलेल्या या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# हंबर्डे शैक्षणिक संकुलात वार्षिक स्नेहसंमेलनाचा रंगतदार उत्सव

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अँड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, अँड. बी. डी. हंबर्डे विधी महाविद्यालय, पिंपळेश्वर इंग्लिश स्कूल तसेच गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल या सर्व युनिट्सचे वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार दि. ७ व गुरुवार दि. ८ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहे.या दोन दिवसीय स्नेहसंमेलनाचे उद्घाटन व कार्यक्रम आष्टीच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बाळकृष्ण हनपुडे पाटील, पोलीस उपनिरीक्षक श्री. शरद भुतेकर आणि गटशिक्षणाधिकारी श्री. मोहन काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे.सालाबादप्रमाणे याही वर्षी हंबर्डे शैक्षणिक संकुलात चारही संस्थांतील विद्यार्थी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत विविध गुणदर्शनात्मक कार्यक्रम सादर करणार आहेत. नृत्य, गायन, नाट्य, एकांकिका, भाषणे तसेच




सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात येणार आहे.आष्टी शहराचा सांस्कृतिक वारसा जपणारा हा कला महोत्सव विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि संघभावना वृद्धिंगत करणारा ठरत असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.या स्नेहसंमेलनास विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक तसेच आष्टी शहरातील कला-रसिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संस्थाध्यक्ष श्री. किशोर हंबर्डे व संचालक मंडळाने केले आहे. ही माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी दिली.

# कै.दत्तासाहेब देशमुख विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

## स्त्री शिक्षण व समाजसुधारणेच्या कार्याला अभिवादन

घनसावंगी ।प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्थेअंतर्गत कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.वर्षा धाईत होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कॉलेजचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक केशव अटकर उपस्थित होते.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्री. अटकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले अथक प्रयत्न समाजसुधारणेतील मोलाचे योगदान शेतकरी व वंचित घटकांबाबतचे विचार तसेच महिला सक्षमीकरणातील सावित्रीबाईंची क्रांतिकारी



भूमिका यावर प्रभावीपणे प्रकाश टाकला.यावेळी जालना जिल्हा क्रिकेट कमिटीच्या अध्यक्षपदी हिरा टेकाळे यांची निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर आपले मनोगत व्यक्त करत प्रेरणादायी विचार मांडले.

कार्यक्रमास शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये कांता खोजे, संभाजी शिंदे, शंकर राठोड, नामदेव तोडकर, मोहसीन सय्यद, डॉ. लक्ष्मण गोरे, प्रा. राजेंद्र सानप, विष्णू गणकवार, जगन्नाथ जाधव, वंदना वाघमारे, हिरा टेकाळे, शामल कांगणे, शबनम पठाण, वंदना सपकाळ, शहनाज पठाण, अरुण राऊत, त्रिंबक लोंढे, विठ्ठल सोमवारे, संतोष घायाळ, रवी गवळी, संतोष लिंगणवाड, अच्युत रेचोडे, बजरंग मोरे, गीताराम शिंदे, सुनील मोताळे, गोविंद भुतेकर, भीमाशंकर वाघुंडे, राजाराम काळे, नागनाथ गोंडगिरे, अरुण नाटकर, पाराजी जवळकर, कृष्णा भापकर, साळवे रावसाहेब आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी विभावरी जोशी हिने केले, तर आभार प्रदर्शन देवयानी दशरते हिने मानले. संपूर्ण कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रेरणा निर्माण झाली.

# ग्रामीण एस.टी.बस सेवेसाठी गावनाव पाट्यांचे वितरण

## दत्ताभाऊ होळकर यांचा सामाजिक उपक्रम

आष्टी (प्रतिनिधी)

ग्रामीण भागात ये - जा करणाऱ्या प्रवाशांना तसेच एस. टी. बस चालक व वाहतूक कर्मचाऱ्यांना गावांची अचूक ओळख व्हावी, या उद्देशाने कडा येथील ग्रामपंचायत सदस्य दत्ताभाऊ होळकर यांनी सामाजिक जबाबदारीतून एस. टी. बससाठी गावाच्या नावाच्या पाट्या भेट दिल्या. हा उपक्रम ग्रामीण वाहतुकीसाठी उपयुक्त ठरणार असून प्रवाशांकडून त्याचे स्वागत करण्यात येत आहे.

ग्रामीण भागात अनेकदा गावांची नावे स्पष्टपणे दिसत नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच नवीन चालक व वाहतूक कर्मचारी यांनाही मार्ग ओळखण्यात अडथळे येतात. ही बाब लक्षात घेऊन दत्ताभाऊ होळकर यांनी स्वतः पुढाकार घेत



गावनाव पाट्यांची निर्मिती करून त्या एस. टी. बस सेवेसाठी उपलब्ध करून दिल्या. या उपक्रमाच्या प्रसंगी वाहतूक नियंत्रक विष्णु कळसाईत, गणेश काळे, सागर रावळ, नितीन मंजुळे यांच्यासह प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा सामाजिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील सार्वजनिक सेवांचा दर्जा उंचावतो, असे मत व्यक्त केले.

दत्ताभाऊ होळकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, ग्रामीण भागाच्या विकासासाठी केवळ मोठ्या योजनाच नव्हे, तर दैनंदिन जीवनाशी संबंधित लहान पण उपयुक्त उपक्रमही महत्त्वाचे असतात. एस. टी. बस ही ग्रामीण जनतेची जीवनवाहिनी असून, तिच्या सेवेत थोडेसे योगदान देता आले, याचा

# गोविंद बजाज यांना मातृशोक

माजलगाव:शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, माहेश्वरी सभेचे माजी जिल्हाध्यक्ष गोविंद बजाज यांच्या आई श्रीमती कौशल्याबाई सुखलालजी बजाज यांचे आज ७ जानेवारी रोजी सकाळी वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले.श्रीमती कौशल्यबाई बजाज यां अतिशय धार्मिक वृतीच्या होत्या. वृद्धत्वमुळे त्यांचे आज रहात्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा गोविंद बजाज, दीर,पुतणे,नातवंड असा मोठा परिवार आहे. आज दुपारी शहरातील राजस्थानी वैकुंठ धाम येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी माजी आ राधाकृष्ण होके पाटील, उद्योजक, व्यापारी,अनेक राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक, डॉक्टर, वकील,पत्रकार, शिक्षक,रोटरी क्लब चें सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या स्मृती मध्ये गोशाळा करिता १ लाख व वैकुठ धाम करिता ५१०००रु देण्यात आले बजाज परिवाराच्या दुःखात दै..... परिवार सहभागी आहे.



मरणोत्तर नेत्रदान

कौशल्यबाई बजाज यांनी मृत्युंपूर्वी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती त्यानुसार त्यांचे दोन्ही डोळे दान सरकारी नेत्र बँकेत करण्यात आले. यामुळे समजातील एका व्यक्तीस दृष्टी मिळणार आहे. असे पुण्याचें काम जाता जाता पुण्यात्मा कौशल्या बाई बजाज यांनी केले.

# मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० अंतर्गत आष्टी-पाटोदा-शिरूर तालुक्यांना मोठा दिलासा

## आ. सुरेश धस यांच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे ११ वीज उपकेंद्रांना नवीन पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर

आष्टी (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांमधील कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या तीनही तालुक्यांतील एकूण ११ वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० व ५ एम. व्ही. ए. क्षमतेचे नवीन ऍडिशनल पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. ही मंजुरी आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रशासनाशी केलेल्या समन्वयपूर्ण चर्चा तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी शासनदरबारी प्रभावीपणे मांडल्यामुळे मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. कृषी वीजपुरवठ्यातील वाढता भार, अपुरी ट्रान्सफॉर्मर क्षमता व तांत्रिक अडचणी यामुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करून आ. धस यांनी हा विषय प्राधान्याने लावून धरला होता.



या निर्णयानुसार ३३/११ के. व्ही. उपकेंद्र, आष्टी आणि ३३/११ के. व्ही. उपकेंद्र, धानोरा येथे १० एम. व्ही. ए. क्षमतेचे नवीन ऍडिशनल पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले आहेत. तर ५ एम. व्ही. ए. क्षमतेचे ऍडिशनल पावर ट्रान्सफॉर्मर ३३/११ के. व्ही. उपकेंद्र सावरगाव, जळगाव (कडा कारखाना), डोईठाण, कुसळंब, लांबरवाडी, कोतन, दासखेड, घाटशीळ पारगाव व भायाळ येथे मंजूर करण्यात आले आहेत.

या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे कृषी पंपांना स्थिर व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार असून भार नियंत्रणात येणार आहे. कमी व्होल्टेजची समस्या दूर होऊन शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत अधिक विश्वासार्ह वीज उपलब्ध होणार आहे. परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आ. सुरेश धस यांनी नेहमीच शेतकरी, कृषी व ग्रामीण विकासाशी संबंधित प्रश्नांना अग्रक्रम दिला आहे. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे व ठाम पाठपुराव्यामुळेच ही महत्त्वाची कामे मंजूर झाल्याची भावना परिसरातील शेतकरी व नागरिकांनी व्यक्त केली असून, राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.

# शिरूर तालुका आदर्श पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

दीपक नागरगोजे,कृष्णा पानसंबळ,कचरू आघाव यांना प्रदान

मानूर प्रतिनिधी ह्व

दर्पण दिनानिमित्त शिरूर तालुका आदर्श पत्रकार संघाच्या वतीने जाहीर करण्यात आलेले सामाजिक,प्रशासकीय आणि उद्योग क्षेत्रातील आदर्श पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले.छत्रपती संभाजी महाराज चौकात आयोजित करण्यात आलेल्या आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.आदर्श समाजसेवक पुरस्कार आर्वी येथील शांतीवन सामाजिक संस्थेचे संस्थापक दीपक नागरगोजे,आदर्श प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता कृष्णा




पानसंबळ आणि आदर्श उद्योजक म्हणून कचरू आघाव यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांच्यासह सिद्धेश्वर संस्थानचे विवेक महाराज शास्त्री,ज्येष्ठ नेते दशरथ वनवे,ज्येष्ठ नगरसेवक वसंत काटे,गटनेते गणेश भांडेकर,उपनगराध्यक्ष प्रकाश देसरडा यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.




बीड/प्रतिनिधी

दि.६ जानेवारी २०२६ रोजी परळी वैजनाथ येथे

शासकीय कृषी महा विद्यालय जिरेवाडी परळी वैजनाथ येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्स च्या माध्यमातून आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य दिनेशसिंह चौहाण सर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरीसर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग, डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट,कमोडिटी वइक्विटी मध्ये असेल असलेला फरक,डिमॅट अकाउंट, तसेच सेबीच्या सारथी पचे महत्त्व विशद करत मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी डा.बी.डी.मस्के सर यांनी विशेष प्रयत्न करत सूत्रसंचालन केले तसेच या कार्यक्रमास कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माहिती न दिल्यास वनपरिक्षेत्र कार्यालयास कुलूप ठोकण्याचा इशारा

## सामाजिक कार्यकर्ते संपत सायकड यांची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी व पाटोदा तालुक्यातील वनविभागाच्या अखत्यारित येणाऱ्या वनक्षेत्र कार्यालयामार्फत शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या वापराबाबत संशय व्यक्त करण्यात येत असून, माहितीच्या अधिकारांतर्गत दोन वेळा अर्ज करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अखेर वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयास कुलूप ठोकण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते संपत सायकड यांनी दिला आहे. याबाबत विभागीय वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत शासनाकडून आलेल्या निधीचा गैरवापर झाला आहे का, याबाबत शंका निर्माण झाली आहे. संबंधित निधीतून नेमकी कोणती कामे झाली, त्यांचे अंदाजपत्रक (ईस्टीमेट), कामांचे पूर्णत्व अहवाल, छायाचित्रे व इतर नोंदी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, दोन ते तीन महिन्यांपासून माहिती अधिकार अर्जावर कोणतीही ठोस कार्यवाही अथवा माहिती देण्यात आलेली नाही.

तसेच आष्टी तालुक्यातील सर्व बिटनिहाय कामांची चौकशी करून प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात यावी, गुणवत्तानियंत्रण पथकामार्फत तपासणी व्हावी, तसेच माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शासनाकडून आलेल्या निधीशी संबंधित कामांचे रेकॉर्ड, छायाचित्रे वा अहवाल उपलब्ध नसल्याने संबंधित तत्कालीन अधिकारी, कंत्राटदार यांची जबाबदारी निश्चित करण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

माहिती अधिकार अर्ज व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्रांना दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कार्यवाही करण्यात यावी,



अशीही मागणी सामाजिक कार्यकर्ते संपत सायकड यांनी केली आहे. यासंदर्भात वारंवार प्रत्यक्ष भेटी घेऊनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले.येत्या आठ दिवसांत योग्य ती चौकशी व कार्यवाही न झाल्यास, वनक्षेत्र अधिकारी कार्यालय, आष्टी येथे निषेध नोंदवत कार्यालयास कुलूप ठोकण्यात येईल, असा इशारा शेवटी देण्यात आला आहे.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात लोकमान्य विद्यालयाचा गौरव

हायड्रॉलिक मिनी एक्सकॅव्हेटर प्रयोगास उत्तेजनार्थ बक्षीस

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात खुंटेफळ येथील लोकमान्य विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या प्रदर्शनात माध्यमिक गटातून लोकमान्य विद्यालयाच्या प्रयोगास उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले असून त्यामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. लोकमान्य विद्यालयाचा विद्यार्थी सार्थक रामदास घोडे याने सादर केलेल्या 'हायड्रॉलिक मिनी एक्सकॅव्हेटर' या प्रयोगास परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. विज्ञानातील हायड्रॉलिक तत्त्वांचा प्रभावी वापर करून तयार करण्यात आलेल्या या प्रयोगामुळे औद्योगिक व अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रत्यक्ष उपयोग अधोरेखित करण्यात आला होता. प्रयोगाची संकल्पना,



सादरीकरण आणि कार्यपद्धती यांचा सखोल अभ्यास करून परीक्षकांनी या प्रयोगाची निवड उत्तेजनार्थ बक्षीसासाठी केली.

या यशाबद्दल संस्थेचे हनुमंतराव थोरवे, धैर्यशील थोरवे, शाळेचे प्राचार्य आर. के. सुंबरे तसेच काकडे एम. एम., वाघमारे जी. एल., थोरवे ए. बी., वाळके जे. यु., भालेराव ए. जी., नरवडे पी. के., थोरवे बी. एस., जगताप व्ही., अल्हाडे एस., काकडे आर. जी. यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थी सार्थक घोडे याचे अभिनंदन केले आहे.

या प्रयोगासाठी मार्गदर्शक शिक्षक राकेश बोडखे व काकडे सर यांनी विद्यार्थ्याला योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विज्ञानातील नावीन्यपूर्ण प्रयोगांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, तांत्रिक कौशल्ये व आत्मविश्वास वाढीस लागतो, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. लोकमान्य विद्यालयाच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# कमी पाण्यात गडगंज नफा: बेलखंडीतील शेतकऱ्यांचा रेशीम शेतीचा यशस्वी पॅटर्न!

पाटोदा (प्रतिनिधी):

बीड जिल्ह्यासारख्या दुष्काळी पट्ट्यात शेती करणे हे मोठे आव्हान मानले जाते. मात्र, मौजे बेलखंडी (ता. बीड) येथील शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांना फाटा देत 'रेशीम शेती'चा यशस्वी प्रयोग राबवला आहे. कमी पाणी आणि कमी खर्चात एकरी ५ ते ६ लाख रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळवून त्यांनी जिल्ह्यासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

२० ते २५ एकरवर तुतीचा मळा

बेलखंडी आणि दत्तनगर येथील श्री. गणेश बडगे व इतर प्रगतशील शेतकरी बांधवांनी एकत्रितपणे सुमारे २० ते २५ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड केली आहे. नुकतीच या प्रकल्पाला मान्यवरांनी भेट देऊन पाहणी केली. येथे तयार होणारे उच्च दर्जाचे रेशीम कोष थेट बीड आणि बेंगळुरू येथील बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवले जात आहेत.

रेशीम शेतीची वैशिष्ट्ये आणि फायदा

शेतकऱ्यांनी या व्यवसायाचे गणित मांडताना खालील महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित केले:

भरघोस उत्पन्न: वर्षातून तीन ते चार वेळा पिकाची कापणी होऊन, एकरी अंदाजे ५ ते ६ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते.

कमी खर्च: या पिकाला केवळ शेणखताची गरज लागते. कीड कमी असल्याने फवारणीचा खर्च शून्य



आहे.

पाणी नियोजन: तुतीला इतर पिकांच्या तुलनेत अत्यंत कमी पाणी लागते, ज्यामुळे दुष्काळी भागातही हे पीक तग धरते.

शाश्वत बाजारपेठ: रेशीम कोषांना बेंगळुरू सारख्या मोठ्या बाजारपेठेत मोठी मागणी आहे.

सरकारी योजनांचा आधार

मनरेगा आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) अंतर्गत मिळणाऱ्या शासकीय अनुदानामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक ओझे कमी झाले आहे. या योजनांच्या सहाय्याने शेड उभारणी आणि लागवडीसाठी मोठी मदत मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मान्यवरांची उपस्थिती

या पाहणी दौऱ्याप्रसंगी मा. जिल्हा परिषद सदस्य श्री. महेंद्र गर्जे, मा. पंचायत समिती सदस्य श्री. बबनराव माने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. धनंजय गुंदेकर, श्री. विकास सानप, सरपंच कृष्णा बांगर, अक्षय बांगर यांच्यासह पाटोदा, भायाळा व वाघीरा परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाईच्या मोहित परमार यांच्यावर बीसीसीआयची मोठी जबाबदारी

भारत-न्यूझीलंड सामन्याचे करणार मीडिया नियोजन..

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येत्या ११ जानेवारी रोजी वडोदरा येथे भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात रंगणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (इउउख) मोठी घोषणा केली आहे. या महत्त्वाच्या सामन्याच्या मीडिया नियोजनाची जबाबदारी अंबाजोगाईचे भूमिपुत्र आणि क्रीडा अभ्यासक मोहित परमार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. बीसीसीआयच्या मीडिया नियोजन संघात त्यांची निवड झाल्याने अंबाजोगाईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



मोहित परमार यांना लहानपणापासूनच क्रिकेटची प्रचंड आवड आहे. त्यांनी २००७ पासून क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कामाला सुरुवात केली. अंबाजोगाईत त्यांनी 'अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमी' सुरू करून ग्रामीण भागातील खेळाडूंना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले. त्यांच्या या अकॅडमीतून आतापर्यंत ३९ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवली आहे, तर एका महिला खेळाडूने प्रतिष्ठेच्या 'महिला महाराष्ट्र प्रीमिअर लीग'मध्ये (थचझङ) स्थान मिळवले आहे.

केवळ प्रशिक्षणच नव्हे तर क्रीडा पत्रकारितेतही परमार यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांना बीसीसीआयचे अधिकृत पत्रकार म्हणून मान्यता मिळाली होती. तसेच ते 'स्पोर्ट्स प्लस' या क्रिकेटला वाहिलेल्या वृत्तपत्राचे काम करतात. त्यांच्या याच अनुभवाची आणि क्रिकेट प्रति असलेल्या निष्ठेची दखल घेत बीसीसीआयने त्यांची निवड मीडिया नियोजन टीममध्ये केली आहे.

आगामी भारत-न्यूझीलंड सामन्याच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन आणि नियोजन करण्याची जबाबदारी आता मोहित परमार पार पाडणार आहेत. या निवडीबद्दल क्रिकेट वर्तुळातून आणि अंबाजोगाईकरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीसांचा डोंगरे कुटुंबीयांना मदतीचा हात

## डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी कुटुंबीयांची घेतली भेट

वडवणी प्रतिनिधी-

वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजूर गणेश डोंगरे यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिनिधी म्हणून माजलगांवचे भूमिपुत्र तथा आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी काल मंगळवारी डोंगरे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेत त्यांचे दुःख जाणून घेतले.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तातडीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाख रुपये मदत करणार असल्याचा निरोप त्यांच्यापर्यंत पोहोचवला. सदरील दुःखद घटनेबाबत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना दुरध्वनीव्दारे माहिती दिली.

प्रचाराच्या व प्रवासाच्या व्यस्ततेत असतांना सुध्दा संवेदनशील मुख्यमंत्री महोदयांनी या घटनेबध्दल तीव्र दुःख व्यक्त करत त्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५ लाख रुपयांची तातडीने मदत करण्यात येणार असल्याचे डॉ. शेटे यांच्यामार्फत



डोंगरे कुटुंबीयांना कळवले. याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश तहसीलदारांना देण्यात आले आहेत.याशिवाय डोंगरे कुटुंबाला घरकुल आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करण्याची सुचना सरपंचांना दिली आहे. तसेच लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेतूनही आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी स्पष्ट केले. माजी आमदार केशवराव आंधळे

यांनी मयत डोंगरे यांच्या तिन्ही मुलींच्या शिक्षणासाठी व पुढे त्यांच्या विवाहापर्यंत लागणारा आवश्यक खर्च करण्याचे जाहीर केले आहे. मात्र जिथे गरज असेल तिथे आपण डोंगरे कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचेही ते म्हणाले.हाक द्या, मी कायम मदतीसाठी तत्पर आहे, असे सांगत डॉ. शेटे यांनी कुटुंबाला धीर देत सांत्वन केले. यावेळी त्यांच्या समवेत तहसीलदार वैभव महिंद्रकर, माजी सभापती दिनकरराव आंधळे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, बंडु खांडेकर, सरपंच भगवान कांदे, कल्याण शेप, श्रीमंत मुंडे, सरपंच मयुर आंधळे, रणजीत धस, उत्तरेश्वर खताळ, ऋषिकेश खोटे, सुग्रीव मुंडे, कृष्णा खाडे , संजय बोत्रे यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वेमार्गे अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी,खा.बजरंग सोनवणे यांनी चेन्नईतील बैठकीत मांडले महत्वपूर्ण मुद्दे

केज/प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार,अन्न व सार्वजनिक वितरण विषयक संसदीय स्थायी समिती (२०२५-२६) अंतर्गत अन्नधान्य वाहतूक रेल्वे मार्गाद्वारे हालचाल अधिक कार्यक्षम करण्या बाबतआयोजित करण्यात आलेल्या बैठकीस खा. बजरंग सोनवणे यांनी चेन्नई येथे उपस्थिती लावली.बैठकीत रेल्वेमार्गे अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी,असे महत्वाचे विविध मुद्दे मांडले.या बैठकीत भारतीय अन्न महामंडळ (एफसीआय),रेल्वे विभाग तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सखोल व सविस्तर चर्चा झाली. देशभरात अन्नधान्याची वेळेत व सुरक्षित वाहतूक कशी सुनिश्चित करता येईल,वाहतूक खर्चात कशी बचत करता येईल, तसेच रेल्वे नेटवर्कचा अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध वापर कसा करता येईल,याबाबत विविध मुद्द्यांवर सविस्तर विचारमंथन करण्यात आले.अन्नधान्याची साठवण,वाहतूक व वितरण प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी,विलंब व खर्च यावर उपाययोजना सुचविताना रेल्वेमार्गे वाहतूक अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आला.विशेषत: सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी रेल्वे आणि एफसीआय यांच्यातील समन्वय वाढविणे, आधुनिक लॉजिस्टिक व्यवस्थेचा वापर,तसेच तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना राबविण्या बाबत चर्चा झाली.अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्या साठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा व उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.शेतकरी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अन्नधान्य पुरवठा साखळी अधिक मजबूत,पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले,अन्नधान्याची वेळेत व सुरक्षित वाहतूक ही देशाच्या अन्नसुरक्षे साठी अत्यंत महत्त्वाची असून,रेल्वेमार्गाचा प्रभावी वापर झाल्यास खर्चात बचत होऊन सार्वजनिक



वितरण प्रणाली अधिक सक्षम होईल.या दृष्टीने संसदीय स्थायी समितीच्या माध्यमातून ठोस निर्णय व शिफारसी करण्यातयेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# कामठा (बु.) खंडेराय यात्रेस १५ पासून प्रारंभ; १६ रोजी भव्य पालखी सोहळा

भव्य शंकर पट व कुस्त्याचे आयोजन

अर्धापूर (प्रतिनिधी) जगात प्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रेनंतर नांदेड जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर कामठा (बु.) ता. अर्धापूर येथील खंडोबारायाची यात्रा प्राचीन व ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. यात्रेत नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर आदी जिल्ह्यातून सर्व जाती धर्माचे भाविक मोठ्या संख्येने येतात. राष्ट्रीय सलोखा, ऐक्य जोपासणारे चित्र आपणास पाहावयास मिळते. दि. १५ रोजी खंडोबारायाच्या आरत्या सबिना निघणार आहे.



कामठा (बु.) येथील यात्रेस १५ फेब्रुवारी रोजी प्रारंभ होत आहे व १६ रोजी श्री मल्हार मार्तंड खंडेरायाची पालखी सोहळा दुपारी १ वाजता होणार आहे. यळकोट- यळकोट जय मल्हारच्या गजरात पालखीचा प्रारंभ होतो. मिरवणुकीत ढोल ताशाच्या गजरात खंडोबाचे वारु,चाबकाचे वार हातावर, पायावर घेत भाविक नाचत असतात. गावातून पालखी फिरवतांना भाविक टिपरे, बताशाचा प्रसाद व पालखीवर शाल पांघरून दर्शन घेतात. दरम्यान गावच्या मध्यभागी बुरुजाजवळ दिगांबर हैबतराव डांगे हा भाविक नंग्या तलवारीचे पाच वार स्वतःच्या उघड्या पाठीवर व पोटावर घेतो. हे रोमहर्षक दृश्य पाहण्यासाठी प्रचंड मोठी गर्दी होत असते. शेवटी मंदिराजवळ भाविक लोटांगण घेतात त्यावरून पालखी मंदिरात जाऊन विसर्जित होते.

दि.१७ व १८ जानेवारी रोजी शंकर पटाची स्पर्धा होणार आहे. दि. १७ रोजी मान्यवरांच्या हस्ते सकाळी १० वाजता उद्घाटन होईल तर दि.१९ जानेवारी रोजी दुपारी २ वा. कुस्त्याचे उद्घाटन होईल. उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री,खा. अशोकराव चव्हाण,जि.म.बॅंक अध्यक्ष, माजी खा.

भास्कर पाटील खतगावकर, भाजपाचे बी. आर. कदम,भाजप महानगर अध्यक्ष अमरनाथ राजुरकर,आ.श्रीजयाताई चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डीले, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,जिल्हा परिषद मुख्याधिकारी

मेघना कवली,पोनि. चंद्रशेखर कदम, माजी जि.प.अध्यक्ष संभाजी धुळगंडे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, सामाजिक कार्यकर्ते बालाजी काळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शंकर पटाचे पहिले बक्षीस ३१,००१, शंकरराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ माजी मंत्री भास्कर पाटील खतगावकर यांच्यातर्फे, जंगी कुस्त्यांचे पहिले बक्षीस ११,१११/- प्रशांत रावण वाघमारे यांच्यातर्फे ठेवण्यात आले आहे. उर्वरित भरपूर बक्षीसे आहेत.

श्री.ची स्थापना १८ व्या शतकात रोजी निकम यांनी केली असे म्हणतात तो एक सच्चा भक्त होता त्याच्या मृत्यूनंतर गावकऱ्यांनी गावात समाधी स्थापन केली.या ठिकाणी आज मोठ्या श्रद्धेने भाविक या निमित्ताने जमा होतात. या दिवशी गावात दिवाळी सणासम उत्सव असतो. घराघरात पाहुण्यांची वर्दळ असते,संपूर्ण गाव भरभरून दिसते. ही यात्रा सर्व धर्म समभावाचे बोलके उदाहरण आहे येथे सर्व जाती पंथांचे लोक एक रुपयाने सामील झालेले दिसतात एकंदरीत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व पारंपारिक त्याची झलक येथे पाहताना मोठा आनंद होतो यात्रेत हवसे गवसे नवसे असेही चित्र पहावयास मिळते अशासाठी मनोरंजन म्हणून लोकनाट्याची मैत्री होतात यात्रेच्या तयारीसाठी ग्रामपंचायत कडून साफसफाई विद्युत रोषणाई व पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली जात आहे.



# पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री यांना अभिवादन

विविध क्षेत्रातून पत्रकारांचा सत्कार.

तामसा/ प्रतिनिधी

तामसा येथे पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आलं.तामसा येथे पत्रकार भवनात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजन करून अभिवादन पत्रकार संघातर्फे करण्यात आलं. विविध क्षेत्रातून पत्रकारांचा सत्कार करण्यात आलं तामसा ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच आनंद घंटळवार, उप सरपंच प्रतिनिधी खाजाभाई कुरेशी, माजी सरपंच बालाजी महाजन, ग्रामविकास अधिकारी शंकर आलेवाड, सदस्य शिवराज वारकड, आकाश जाधव अभियंता अविनाश पांडे तसेच माजी उपसभापती शंकर मेंडके, सामाजिक कार्यकर्ते जगदेवराव पवार, नंदू देशमाने, चिकित्सा विभागात तालुका चिकित्सा अधिकारी डॉ. संजय मुरमुरे, डॉ.मोहिनी सूर्यवंशी, डॉ. दिपक जीवने, बाबासाहेब बिडकर, पोलीस ठाण्याचा वतीने सपोनि शहदेव खेडकर, एएसआय अशोक सिंगणवाड, पोको प्रकाश कबले. सामाजिक कार्यकर्ते शिवसेना पदाधिकारी संतोष ठमके, दिलीप कोथळकर, सामाजिक कार्यकर्ते अरविंद कंठाळे, बालाजी कोल्हे, व्यापारी अशोसीयन च्या प्रतिष्ठित व्यापारी रवी बँडेवार, अंनता भोपळे, गणपत हनवते, बबन सेठ परभणकर, संजय यंगळवार सह विविध क्षेत्रातील पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते नी दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान करून सत्कार करण्यात आला यावेळी मराठी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष संजय राहुलवार, देवबा पाटील डोरले, गौतम कदम, बालासाहेब खांनजोडे, अर्जुन जोशी, अरविंद हुंडेकर, लक्ष्मण वाघमारे, गजानन जिद्देवार, शिवदास बेलुरे, मारुती काकडे, राष्ट्रपाल, शिवाजी खुणे, संतोष डवरे, अंकुश मिराशे, महेश मठपती पत्रकाराचे सत्कार करण्यात आलं..




# महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयुक्त यांच्यी विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे सदिच्छा भेट

नवीन नांदेड - महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयुक्त छत्रपती संभाजी नगर किरण जाधव यांनी विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे सदिच्छा भेट देऊन ग्रामपंचायत मार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सात सुविधा बाबत तपासणी करून उत्कृष्ट सेवेबद्दल अभिनंदन केले.

राज्यसेवा हक्क आयुक्त किरण जाधव यांनी नांदेड तालुक्यातील विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे ७ जानेवारी रोजी भेट दिली यावेळी गट विकास अधिकारी प्रविण सुरडकर, सहाय्यक गट विकास अधिकारी मोहीते, विस्तार अधिकारी व्हि.बी.कांबळे,आर.केद्रे, यांच्या सह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सरपंच संध्याताई विलास हंबर्डे, ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे,संगनक चालक ऊग्रेसन हंबर्डे, संतोष हंबर्डे लिपीक कालीदास बारसे,माणिक हंबर्डे,साईनाथ पांचाळ , पत्रकार रमेश ठाकूर व सारंग नेरलकर यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तर संगनक चालक ऊग्रेसन हंबर्डे यांच्या आयुक्त किरण जाधव यांच्या हस्ते उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. आयुक्त किरण जाधव यांनी ऑनलाईन देण्यात येणाऱ्या सुविधा बाबत माहिती घेतली व वर्ष भर आढावा घेऊन उत्कृष्ट सेवेबद्दल प्रशंसा केली

# जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशासनच आले 'सलाईनवर'

## ए.म.ओ. संघटना आक्रमक; आंदोलनाचा इशारा

तामसा /प्रतिनिधी

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षमपणे चालविण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचेच अनेक महत्त्वाचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने संपूर्ण जिल्हा आरोग्य प्रशासनच 'सलाईनवर' असल्याची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे. तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विविध प्रशासकीय अडचणींकडे जिल्हा आरोग्य प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत असून, या प्रश्नांच्या निराकरणासाठी ए.एम.ओ. संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. या विषयावर जिल्हा आरोग्य अधिकारी काय भूमिका घेतात की दरवेळी सारखे निवेदन घेऊन बाजूला ठेवत वेळ पुढे ढकलत नेतात हे पाहणे तितकेच गरजेचे आहे...



जिल्ह्यातील तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा पुस्तके अद्ययावत करणे, कर्मचाऱ्यांच्या रजाप्रकरणांचा तातडीने निपटारा करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन नियमित करणे, तसेच कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल महापार प्रणालीवर अद्ययावत करून त्याच्या प्रती संबंधितांना उपलब्ध करून देणे, या प्रमुख मागण्या संघटनेने मांडल्या आहेत. याशिवाय, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित कामांसाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक मागणी होऊ नये, वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रवास भत्ता मंजूर करण्यात यावा, शासनाने मान्य केलेल्या पी.आय.पी.ची माहिती वेळेत मिळावी, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निधी विहित कालावधीत मंजूर करावा, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर रुग्णांसाठी आवश्यक औषधसाठा व साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या सर्व अडीअडचणींवर तोडगा काढण्यासाठी कर्मचाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करून प्रश्नांचे तात्काळ निराकरण करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. याबाबत प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास संघटनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय मुरमुरे यांनी दिला आहे.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनावर डॉ. प्रकाश गुरुतवाड, हनुमंत पाटील, के. पी. गायकवाड, संजय कासराळीकर, श्रीकांत देसाई, आकाश देशमुख, गणपत वाडेकर, दीपक कदम, प्रवीण मुंडे, संदेश राठोड, गजानन काळे आदी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# समाजहिताच्या रक्षणात पोलिस व पत्रकारांची भूमिका समान ठरेल

## उपविभागीय पोलिस अधीक्षक श्याम पानेगावकर

नायगाव तालुक्यातील बरबडा , कुंटूर , माजरंम , नरशी एकुण चार सर्कल अंतर्गत पत्रकार दिनानिमित्त नायगाव येथे

समाजाच्या हितासाठी पोलिस व पत्रकार हे दोन्ही घटक सारखीच महत्त्वाची भूमिका बजावत असून, पत्रकारितेच्या बदलत्या प्रवाहात केवळ प्रिंट मीडियाच नव्हे तर सोशल मीडियानेही सजग व जबाबदार पावले उचलणे आवश्यक आहे. समाजहिताला केंद्रस्थानी ठेवून केली जाणारी पत्रकारिता ही आदर्श ठरेल आणि तीच पत्रकारिता जनतेच्या मनाला भावणारी ठरेल, असे प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधीक्षक श्याम पानेगावकर यांनी केले.

ते पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार गौरव सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्हॉईस ऑफ मीडिया, तालुका यांच्या वतीने दि. ६ जानेवारी रोजी जनता हायस्कूल येथील स्व. माजी आ. बळवंतराव चव्हाण सभागृह, नायगाव येथे हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन कुंटूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त प्राचार्य रमेश कदम, साहित्यिक व व्याख्याती प्रा. राजेश्वरी कदम, व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, ज्येष्ठ पत्रकार माधव मामा कोकुर्ले, शेख वहाबुद्दीन, भा. ग. मोरे सर, प्रा. डॉ. शंकरराव गडमवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समाजहितासाठी ग्रामीण पत्रकारांचे योगदान मोलाचे - सौ. राजेश्वरी कदम

कार्यक्रमात समाजहितासाठी पत्रकारांचे योगदान या विषयावर प्रा. राजेश्वरी कदम यांचे प्रभावी व्याख्यान झाले.

त्या म्हणाल्या, ग्रामीण भागातील जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण



कार्य पत्रकार करीत असून, समाज घडवण्यात ग्रामीण पत्रकारांचे योगदान अनमोल आहे. दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्रामुळे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली गेली, असे त्यांनी नमूद केले.

पत्रकाराने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली नाही, तर समाज दिशाहीन होतो. म्हणूनच पत्रकाराची लेखणी ही निर्भीड, सजग व जबाबदार असली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. शासनाच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचतात की नाही, यावर लक्ष ठेवण्याचे काम पत्रकार करतो. महिला सुरक्षा असो वा ग्रामीण विकास - सर्वच क्षेत्रांत पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या वेळी स.पो.नी.विशाल भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नायगाव तालुक्यातील पत्रकार बांधवांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास व्हॉईस मिडियाचे ५० च्या वर शिलेदार उपस्थित होते .यावेळी नुकतेच निधन झालेले पत्रकार मित्र सुभाष पेरकेवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

व्हॉईस ऑफ मिडिया च्या सर्व पत्रकाराचा पेन डायरी पुष्प देऊन सत्कार करण्यात आला याच वेळी स्व.पत्रकार रामप्रसाद चनावार यांचे स्मरणात त्यांचे बंधू लक्ष्मण चनावार यांनी ही पेन, डायरी ,व दिनदर्शिका देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला आहे




**अर्धापूर शहरातील बँक ऑफ इंडिया बॅंकेचे शाखाधिकारी विनोद मुजमुले यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार निळकंठराव पाटील मदने, पत्रकार सखाराम क्षीरसागर, कार्याध्यक्ष उदयकुमार गुंजकर यांचा सत्कार करून डायरी व पेन भेट देऊन दर्पण दिन साजरा करण्यात आला.यावेळी बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी,पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते**

# भक्तीच्या प्रेरणेतून युवा शक्तीचे रक्तदान

## आज भोकर येथे रक्तदान महाकुंभातून सामाजिक उत्क्रांतीची नवी पहाट

भोकर प्रतिनिधी

भोकर / जगद्गुरू रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून समाजपरिवर्तनाचे अखंड व्रत जपणाऱ्या श्री संप्रदायाच्या वतीने रक्तदान महाकुंभ-२०२६ चे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहात सुरू आहे. दि. ४ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या महाअभियानाअंतर्गत भोकर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर, भोकर येथे सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबिर संपन्न होणार आहे. या शिबिरात भोकर तालुक्यातील जास्तीत जास्त युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदानाद्वारे समाजसेवेचे पवित्र कार्य करावे, असे आवाहन श्री संप्रदाय तालुका सेवा समिती, भोकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री संप्रदायाच्या माध्यमातून अहोरात्र ४१ सामाजिक उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये मरणोत्तर देहदान व अवयवदान, मोफत रुग्णवाहिका सेवा, गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत इंग्रजी माध्यमाच्या शाळा, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत, शालेय साहित्य वाटप, वनराई बंधारे उभारणी, आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत अशा बहुआयामी सामाजिक कार्यांचा समावेश आहे. तसेच कोरोना महामारीच्या काळात महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीस अडीच कोटी रुपयांची मदत देऊन संप्रदायाने सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

सध्या सिकलसेल, थॅलेसेमिया, थायरॉईड, ब्लड कॅन्सर, अपघातग्रस्त रुग्ण तसेच शस्त्रक्रियेसाठी आवश्यक रक्त यासाठी लाखो रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा संघर्ष करावा लागत आहे. गरीब व गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उदात्त आणि मानवतावादी हेतूनेच हा रक्तदान महाकुंभ आयोजित करण्यात आला आहे.

भक्ती ही प्रेरणा आहे आणि युवा शक्ती ही क्रांती आहे या विचारातून साकारलेला हा रक्तदान महाकुंभ केवळ एक शिबिर नसून समाजात मानवतेची नवी चळवळ निर्माण करणारा यज्ञ आहे. ज्यांना आपल्या पुण्यसंचयात भर घालायची आहे, त्यांनी या महाकुंभात सहभागी होऊन रक्तदानाद्वारे जीवदान करावे, असे नम्र आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

भक्तीचा प्रकाश आणि युवकांची ऊर्जा यांच्या संगमातूनच सामाजिक उत्क्रांती शक्य आहे, हे भोकर येथील हे रक्तदान शिबिर पुन्हा एकदा ठामपणे अधोरेखित करीत आहे.




कंधार प्रतिनिधी

फुलवळ ग्रामस्थ आणि बालाजी देवकांबळे यांच्या वतीनं पत्रकार दिनाचे औचित्य साधून मोठ्या उत्साहात पत्रकार दीन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रदीप राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली फुलवळ येथे मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या समृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. पत्रकारीतेच्या समस्यांबाबत अनेकानी मार्गदर्शन व संवाद घडवला. यावेळी फुलवळचे माजी सरपंच तथा विद्यमान ग्रा.प.सदस्य बालाजी देवकांबळे यांनी पत्रकारांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत ६ जानेवारी हा दिन मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रात अत्यंत महत्वाचा समजला जातो.प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटावा,असा हा दिन असून फुलवळ सह शहरातील पत्रकारांचा गेली दहा वर्षांपासून सन्मान फुलवळ नगरीत केला जात असल्याने याचा आम्हाला आनंद असल्याची भावना व्यक्त केली.